दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–६१ | गुरूवार दि.२१ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय
### कवडीमोल कांदा आणि उद्ध्वस्त होत चाललेला बळीराजा

महाराष्ट्राच्या राजकारणात कांदा हा केवळ एक कृषीमाल नाही, तर तो शेतकऱ्यांच्या घामाचा, अर्थकारणाचा आणि सत्तेच्या समीकरणांचा केंद्रबिंदू राहिला आहे. अनेकदा कांद्याच्या दराने सरकारे हादरली, सत्तेची समीकरणे बदलली आणि जनतेचा संताप रस्त्यावर उतरला. आज पुन्हा एकदा महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकरी अशाच असंतोषाच्या उंबरठ्यावर उभा आहे. कारण केंद्र सरकारने कांदा खरेदीसाठी जाहीर केलेला १,२३५ रुपये प्रतिक्विंटल हा दर शेतकऱ्यांच्या अपेक्षांवर पाणी फेरणारा आणि त्यांच्या आर्थिक जखमेवर मीठ चोळणारा ठरला आहे.

# एल निनो च्या सावटात खतपुरवठ्याचे आव्हान

## खतटंचाईची केंद्राची कबुली; शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचा सल्ला

भुवनेश्वर । वृत्तसंस्था

**आंतरराष्ट्रीय बाजारात रासायनिक खते सहज उपलब्ध होत नसल्याने देशासमोर खत खरेदीचे मोठे आव्हान उभे राहिले असल्याची स्पष्ट कबुली केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंग चौहान यांनी दिली. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारे आणि शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीचा अवलंब करण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. ओडिशातील भुवणेश्वर येथे आयोजित पूर्व विभागीय कृषी परिषदेत ते बोलत होते.**



जागतिक स्तरावर पुरवठा साखळी विस्कळीत झाल्यामुळे खतांच्या उपलब्धतेवर परिणाम होत असल्याचे सांगताना चौहान म्हणाले की, "आंतरराष्ट्रीय बाजारात खते सहजपणे मिळणे कठीण झाले आहे. देशातील शेतकऱ्यांना वेळेत खते उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकार जिथे शक्य आहे तिथून खते खरेदी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे." केंद्रीय कृषिमंत्र्यांनी खतांच्या गैरवापरावरही चिंता व्यक्त केली. अनुदानित खतांचा इतर क्षेत्रांकडे वळवला जाणारा पुरवठा रोखणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या खत विक्रीला आळा घालण्यासाठी राज्य सरकारांनी कठोर तपासणी मोहीम राबवावी, असे निर्देश त्यांनी दिले. "शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### नदीजोडची कामे पूर्ण करा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

मुंबई: राज्यातील महत्वाच्या नदीजोड प्रकल्पांची कामे निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. कोकण–गोदावरी, दमणगंगा–वैतरणा–गोदावरी, दमणगंगा–एकदरे–गोदावरी तसेच कोकण–गोदावरी वळण योजना या नदीजोड प्रकल्पांचा सविस्तर आढावा मंत्री विखे पाटील यांनी घेतला. मंत्रालयात आयोजित बैठकीमध्ये प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेताना मंत्री विखे पाटील यांनी कामांची गती वाढवून प्रत्येक टप्प्यासाठी निश्चित कालमर्यादा ठरविण्याचे निर्देश दिले. राज्याच्या दीर्घकालीन जलव्यवस्थापनासाठी तसेच दुष्काळग्रस्त भागांना दिलासा देण्यासाठी हे प्रकल्प अत्यंत महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

### मुख्यमंत्री विजय यांचे भ्रष्टाचार विरोधी पाऊल

चेन्नई: तामिळनाडूचे मुख्यमंत्री थलपती विजय यांच्या नेतृत्वाखालील टीव्हीके (तामिळागा वेट्री कझगम) सरकार सत्तेवर आल्यापासून जनहिताच्या विविध निर्णयांवर काम करत आहे. आता भ्रष्टाचार निर्मूलनासाठी सरकारने एक महत्त्वपूर्ण आणि क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. सरकारी प्रशासनात पारदर्शकता आणण्याच्या उद्देशाने भ्रष्टाचारविरोधी यंत्रणेला अधिक मजबूत करण्यात आले आहे. मुख्यमंत्री थलपती विजय यांनी भ्रष्टाचाराविरुद्ध लढा अधिक प्रभावी करण्यासाठी एक नवी प्रोत्साहन योजना जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत, कोणत्याही सरकारी विभागातील अधिकारी किंवा कर्मचारी यांनी १००० रुपयांची देखील लाच मागितल्यास, नागरिकांनी पुराव्यासह (व्हिडिओ किंवा ऑडिओ) तक्रार दाखल करावी. अशा तक्रारकर्त्याला १ लाख रुपयांचे रोख बक्षीस देण्यात येणार आहे.

### शेतकऱ्यांसाठी २५ टक्के पेट्रोल पंप राखीव करा

जळगाव: राज्यातील अनेक भागात इंधनाचा तुटवडा भासत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणच्या पेट्रोल पंपावर रांगा लागल्या आहेत. जळगाव जिल्ह्यात देखील काही भागात इंधनाचा तुटवडा भासत आहे. याच मुद्यावरुन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष आक्रमक झाला आहे. पुढील २४ तासात सरकारने शेतकऱ्यांसाठी २५ टक्के पेट्रोल पंप राखीव न केल्यास, कोणतेही सरकारी वाहन रस्त्यावर फिरु देणार नाही, असा इशारा राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या वतीने जळगावमध्ये देण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या शेत जमिनी तयार करताना मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. येत्या पंधरा दिवसात जर शेतकऱ्यांच्या जमिनी तयार होऊ शकल्या नाहीत तर पेरण्या करण्यास अडचणी निर्माण होऊन, शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणीत वाढ होणार आहे. त्यामुळे तातडीने शेतकऱ्यांसाठी सरकारने डिझेल पंप राखीव करण्यात यावे अशी मागणी केली आहे.

# देशाच्या डोक्यावर आर्थिक वादळ घोंघावतंय अन् पंतप्रधान चॉकलेट वाटण्यात मश्गुल

## ● राहुल गांधींची मोदी यांच्यावर बोचरी टीका



### "मोदी–शाह यांच्याकडून संविधानावर आक्रमण

नरेंद्र मोदी आणि अमित शाह हे दोघेही भारतीय संविधानावर आक्रमण करत आहेत. अदानी, अंबानी यांना देशाची संपत्ती देणे, हे आक्रमण आहे. देशातील विद्यापीठांमध्ये सर्व ठिकाणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या लोकांना कुलगुरुपदी आणून बसवले जात आहे. निवडणूक आयोग आणि न्यायव्यवस्था नष्ट केली जात आहे. अशाप्रकारे संविधानावर आक्रमण करणाऱ्यांना गद्दार म्हणतात. म्हणून मी मोदी–शाह यांना गद्दार म्हणतो. मी त्यासाठी कधीही घाबरत नाही. मी कधी माफी मागणार नाही,मी तुम्हाला घाबरत नाही, असे राहुल गांधी यांनी म्हटले.

दिल्ली । वृत्तसंस्था

**देशाच्या डोक्यावर आर्थिक वादळ घोंघावत असताना आपले पंतप्रधान इटलीत चॉकलेटस वाटण्याच मश्गुल आहेत. देशातील शेतकरी, तरुण, महिला, मजूर आणि लहान शेतकरी दु:खात आहेत. दोन महिन्यांपासून देशात बेरोजगारी वाढतेय हे मी सांगतोय, पण माझी खिल्ली उडवली जात आहे. पंतप्रधान मोदी हसत आहेत, रिल्स बनवत आहेत आणि भाजपचे लोक टाळ्या वाजवत आहेत. याला नेतृत्व म्हणत नाहीत, ही नौटंकी आहे, असे ट्विट राहुल गांधी यांनी केले आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सध्या इटलीच्या दौऱ्यावर आहेत. मंगळवारी रात्री इटलीत दाखल झाल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी इटलीच्या पीएम जॉर्जिया मेलोनी यांची भेट घेतली. यानंतर या दोघांनी रोम शहरात एक खास फोटोसेशन केले. मोदी–मेलोनींचे हे फोटो सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहेत. तसेच पंतप्रधान मोदी यांनी स्वत:च्या इन्स्टाग्राम ▶▶ पान २ वर

# अजित पवारांच्या राष्ट्रवादीत मोठ्या उलथापालथीचे संकेत

## २२ आमदारांनी घेतली शरद पवारांची भेट; राज्याच्या राजकारणात खळबळ



पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसभोवती मोठ्या घडामोडी घडत असल्याची चर्चा आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सर्व काही आलबेल नसल्याचे संकेत मिळत असून, तब्बल २२ आमदारांनी ज्येष्ठ नेते शरद पवारांची गुप्त भेट घेतल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. या भेटींमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात अनेक तर्क–वितर्कांना उधाण आले आहे. विशेष म्हणजे, या आमदारांच्या भेटीनंतरच पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांनीही शरद पवारांची भेट घेतल्याची चर्चा आहे. त्यामुळे राष्ट्रवादीत अंतर्गत अस्वस्थता वाढल्याच्या चर्चांना आणखी बळ मिळाले आहे.

सुत्रांच्या माहितीनुसार, अजित पवार गटातील काही आमदार सध्या राजकीय भविष्याबाबत साशंक आहेत. पक्षातील नेतृत्व, आगामी निवडणुकांची रणनीती आणि स्थानिक पातळीवरील समीकरणे यावरून नाराजीचा सूर असल्याचे बोलले जात आहे. याच पार्श्वभूमीवर काही आमदारांनी थेट शरद पवारांशी संवाद साधल्याची माहिती समोर येत आहे. मात्र, या भेटींमध्ये नेमकी काय चर्चा झाली किंवा कोणते आमदार सहभागी होते, याबाबत अधिकृत माहिती अद्याप मिळाली नाही. सुत्रांच्या मते, आमदारांच्या हालचाली आणि पक्षातील वाढती अस्वस्थता लक्षात घेऊनच ही भेट झाल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, अजित पवारांच्या राष्ट्रवादीतील अनेक आमदार शरद पवारांच्या संपर्कात असल्याच्या चर्चांमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा नव्या समीकरणांची शक्यता वर्तवली जात आहे. विशेषतः आगामी ▶▶ पान २ वर

# वाल्मीक कराडची प्रकृती खालावली; कारागृहातच उपचार सुरू



बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड याची प्रकृती पुन्हा बिघडल्याची माहिती समोर आली आहे. सध्या त्याच्यावर बीडच्या कारागृहातच उपचार सुरू असून गेल्या तीन दिवसांपासून त्याला सलाईन लावण्यात आल्याचे समजते. प्रकृतीत सुधारणा न झाल्यास त्याला पुढील उपचारासाठी अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात हलवण्यात येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सरपंच संतोष देशमुख यांच्या अपहरण, खंडणी आणि हत्या प्रकरणात वाल्मीक कराडसह सात ▶▶ पान २ वर

# भोंदू अशोक खरातला २६ मे पर्यंत ईडी कोठडी

नाशिक । प्रतिनिधी



भोंदू बाबा आणि मनी लॉड्रिंग प्रकरणातील आरोपी आणि अशोक खरातला २६ मे पर्यंत अंमलबजावणी संचालनालय कोठडी सुनावली आहे. या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीसाठी ईडीने न्यायालयात १० दिवसांची कस्टडी मागितली होती, परंतु न्यायालयाने ६ दिवसांची कोठडी मंजूर केली आहे.

माझ्याकडे आलेले पैसे मी समता पतसंस्थेच्या मॅनेजरला दाखवले होते. ही सहकारी बँक असून येथे ९ टक्के व्याज मिळते, असे सांगून त्यांनीच मला हे पैसे वेगवेगळ्या अकाउंटमध्ये ठेवण्याचा सल्ला दिला होता. त्यानुसार मी ते पैसे ठेवले; पण मला सगळ्या अकाउंटला ▶▶ पान २ वर

# मागासवर्गीय जातींमधील लोकांची संख्या सरकारला माहीत असणे आवश्यक–सर्वोच्च न्यायालय



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

आगामी जनगणनेचा एक भाग म्हणून जातीनिहाय गणना करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी (दि.२० मे) फेटाळून लावली. कल्याणकारी योजना आखण्यासाठी मागासवर्गीय जातींमधील लोकांची संख्या सरकारला माहीत असणे आवश्यक आहे, असे निरीक्षण न्यायालयाने यावेळी नोंदवले.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जोयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विमुल पांचोली यांच्या खंडपीठासमोर ▶▶ पान २ वर

# धाराशिव–बीड–लातूर विधानपरिषदेसाठी भाजपकडून 'या' ३ नावांची चर्चा

लातूर । प्रतिनिधी

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून निवडून द्यायच्या विधानपरिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. यामध्ये धाराशिव–बीड–लातूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाचाही समावेश असून, महायुतीत उमेदवारीवरून मोठी चुरस निर्माण होण्याची शक्यता आहे.**

धाराशिव-बीड-लातूर मतदारसंघातून भाजपकडून माजी मंत्री बसवराज पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी आणि अर्चना पाटील–चाकूरकर यांची नावे चर्चेत असल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे, बीड जिल्हा परिषदेची निवडणूक अद्याप झालेली नसतानाही ७५ टक्क्यांपेक्षा ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.२० मे २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२८.०० क्विंटल | २,१३० | ३,१०१ | २,३९६ |
| ज्वारी/हायब्रिड: १३५.०० क्विंटल | १,९०१ | ३,७५० | २,३८३ |
| मका/लोकल: ११४.५० क्विंटल | १,७९२ | १,९०० | १,८५२ |
| तूर : ४१.५० क्विंटल | ७,३०० | ७,८०० | ७,५५० |
| उडीद : ३.५० क्विंटल | ५,५०१ | ६,१०० | ५,८६७ |
| बाजरी: ११५.५० क्विंटल | २,०२० | २,६२१ | २,२३१ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: १७.०० क्विंटल | ५,४०० | ५,७०१ | ५,५०७ |

# माटेगावकराची साखळी सीबीआयच्या निशाण्यावर

## लातूरमध्ये क्लासेस चालकाची हत्या तर बीडमध्ये झाला होता गोळीबार

बीड । प्रतिनिधी

**नीट पेपर फुटी प्रकरणी लातूर येथील आरसीसी खासगी कोचिंग क्लासेसचे संचालक मोटेगावकर यांच्या अटकेनंतर आता त्यांच्या सानिध्यात असलेल्या आणि साखळीमध्ये असलेल्या अनेकांची चौकशी सुरू केली आहे. विशेषत: मागील दोन वर्षांपूर्वी लातूरमध्ये चव्हाण या प्राध्यापकाची हत्या झाली होती तर बीडमध्ये एका क्लासेस चालकावर गोळीबार झाला होता या सर्व प्रकारची कुंडली आता खोलण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे बीड मधील आणखी काही यात अडकतात का याकडे लक्ष लागले आहे.**




राज्यभर खासगी क्लासेसचे पेव मोठ्या प्रमाणात फुटले, शिक्षणाचा बाजार मांडणारे लातूर मधील क्लासेस चालकाचे कारनामे नीट पेपर फुटी मुळे पुढे आले आहेत. माटेगावकर याचा खरा चेहरा पुढे आला असून, मागील एक वर्षापूर्वी एकाच विद्यार्थ्यांचे चार–चार खासगी क्लासेस चालकांनी बॅनरवर फोटो लावून हा आमचा विद्यार्थी आहे, असे सांगण्याचा प्रयत्न केला होता. २२ जून २०२३ रोजी या प्रकरणात वृत्तपत्राने आवाज वाढवला मात्र पुढे काही झाले नाही. खासगी क्लासेस चालकांनी शिक्षणाचा बाजार मांडला आणि यातून पुढे शैक्षणिक गँगवर




व्यवसायामधून सुरू झाले. लातूर येथील एका अविनाश चव्हाण नावाच्या क्लासेस चालकाची याच गँगवॉरमधून हत्या करण्यात आली होती. या मागील सूत्रधार कोण आहेत देखील आता पुढे येण्याची शक्यता आहे. त्याचे धागे पकडुन मोटेगावकर आणि यांच्या आरसीसी क्लासेसपर्यंत मिळतात का याचाही तपास सीबीआय करत आहे. याच दरम्यान बीड ▶▶ पान २ वर

## अग्रलेख

# कवडीमोल कांदा आणि उद्ध्वस्त होत चाललेला बळीराजा

महाराष्ट्राच्या राजकारणात कांदा हा केवळ एक कृषीमाल नाही, तर तो शेतकऱ्यांच्या घामाचा, अर्थकारणाचा आणि सत्तेच्या समीकरणांचा केंद्रबिंदू राहिला आहे. अनेकदा कांद्याच्या दराने सरकारे हादरली, सत्तेची समीकरणे बदलली आणि जनतेचा संताप रस्त्यावर उतरला. आज पुन्हा एकदा महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकरी अशाच असंतोषाच्या उंबरठ्यावर उभा आहे. कारण केंद्र सरकारने कांदा खरेदीसाठी जाहीर केलेला १,२३५ रुपये प्रतिक्विंटल हा दर शेतकऱ्यांच्या अपेक्षांवर पाणी फेरणारा आणि त्यांच्या आर्थिक जखमेवर मीठ चोळणारा ठरला आहे.

तीन वर्षांपूर्वी केंद्र सरकारने २,४१० रुपये प्रतिक्विंटल दराने कांदा खरेदी केला होता. त्या काळातही शेतकऱ्यांनी उत्पादन खर्च वाढल्याची तक्रार केली होती. मात्र, त्यानंतर खतांचे दर, बियाण्यांचा खर्च, कीटकनाशके, मजुरी, वाहतूक, वीजबिल आणि साठवणूक यामध्ये प्रचंड वाढ झाली आहे. शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर खर्च वाढलेला असताना सरकारने जाहीर केलेला दर हा जवळपास निम्म्यावर आणल्याने संताप उसळणे स्वाभाविक आहे. हा दर उत्पादन खर्चही भरून काढू शकत नाही, असे स्पष्टपणे शेतकरी संघटना सांगत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या उपस्थितीत ही घोषणा केली. परंतु सरकारच्या या निर्णयाने शेतकऱ्यांच्या वेदनेत भरच पडली. महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांनी या निर्णयाला ''शेतकरीविरोधी'' असे संबोधत सरकारवर कठोर टीका केली. उत्पादन खर्चाच्या तुलनेत हा दर अपुरा असून, सरकारने तातडीने निर्णय दुरुस्त केला नाही तर शेतकरी रस्त्यावर उतरतील, असा इशाराही त्यांनी दिला. राज्यातील विविध भागांमध्ये सुरू झालेली आंदोलने ही केवळ भाववाढीची मागणी नसून सरकारच्या कृषी धोरणांविरोधातील व्यापक नाराजीचे प्रतीक बनली आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) यांनीही या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेत आंदोलनात सहभाग घेतला आहे. कांद्याची आशियातील सर्वांत मोठी बाजारपेठ असलेल्या लासलगावमध्ये आमदार रोहित पवार यांनी केलेले आंदोलन हे सरकारविरोधातील असंतोषाचे मोठे प्रतीक ठरले. ''कांद्याचा उत्पादन खर्च १८ रुपये प्रतिकिलो असताना बाजारात तो २ ते ३ रुपयांत विकला जातोय,'' असे सांगत त्यांनी सरकारने किमान २५ ते ३० रुपये प्रतिकिलो हमीभाव द्यावा, अशी मागणी केली. छत्रपती संभाजीनगर, वैजापूर, नाशिक, अहमदनगर अशा भागांमध्ये रस्तारोको, चक्का जाम आणि निदर्शने यामुळे वाहतूक विस्कळीत झाली. समृद्धी महामार्गावर आंदोलकांनी टायर जाळून निषेध व्यक्त केला. या आंदोलनांचे गांभीर्य सरकारने लक्षात घेणे आवश्यक आहे. कारण ही आंदोलने केवळ राजकीय स्वरूपाची नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या कोसळत्या अवस्थेची तीव्र अभिव्यक्ती आहेत. राज्याच्या रबी हंगामात सुमारे ७० लाख टन कांद्याचे उत्पादन होते. त्या तुलनेत सरकार फक्त दोन लाख टन कांदा खरेदी करणार असल्याची घोषणा करते. म्हणजेच संपूर्ण उत्पादनाच्या केवळ अत्यल्प भागासाठी सरकारी हस्तक्षेप राहणार आहे. एवढ्या मर्यादित खरेदीने बाजारभावात स्थैर्य येणे अशक्य आहे. ही घोषणा शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर मलमपट्टी करण्याऐवजी केवळ डोळेपुसणी असल्याची भावना ग्रामीण भागात निर्माण झाली आहे.ङ्गकांदा हा नाशवंत माल असल्यामुळे शेतकऱ्यांकडे दीर्घकाळ साठवून ठेवण्याची क्षमता नसते. थंडगार गोदामे, साठवणूक सुविधा आणि निर्यात धोरणातील स्थैर्य नसल्याने शेतकऱ्यांना तोटा सहन करतच माल विकावा लागतो. सरकारने अनेकदा निर्यातबंदी, निर्यात शुल्क आणि बाजारातील हस्तक्षेप यांच्या माध्यमातून ग्राहकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला; परंतु या प्रक्रियेत शेतकरी मात्र कायम तोट्यात गेला. ग्राहकांना स्वस्त कांदा मिळावा म्हणून उत्पादकांचे नुकसान करणे ही दीर्घकालीनदृष्ट्या धोकादायक भूमिका आहे. कारण शेवटी शेतकरीच उद्ध्वस्त झाला तर उत्पादनच कोसळेल.

आज परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की काही ठिकाणी कांद्याला १ ते ३ रुपये किलो असा दर मिळत आहे. अनेक शेतकऱ्यांना वाहतूक खर्चही निघत नाही. त्यामुळे कांदा शेतातच टाकून देण्याची वेळ आली आहे. अहमदनगरमधील शेतकरी राहुल बहिरट यांनी कमरेला केळीची पाने गुंडाळून आणि गळ्यात कांद्याच्या माळा घालून केलेले आंदोलन हे ग्रामीण भागातील हतबलतेचे प्रतीक आहे. ''कांद्याला योग्य भाव मिळाला नाही तर कपडे उतरवण्याची वेळ येईल,'' ही त्यांची प्रतिक्रिया केवळ भावनिक नाही, तर शेती अर्थकारणातील विदारक वास्तव दाखवणारी आहे. सरकारने या प्रश्नाकडे केवळ तात्पुरत्या अनुदानाच्या चौकटीत पाहणे थांबवले पाहिजे. कांद्याला दीर्घकालीन हमीभाव धोरण, निर्यातीत सातत्य, प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन, साठवणूक व्यवस्थेचा विस्तार आणि बाजारपेठेतील स्थैर्य या पाच मुद्द्यांवर ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. अन्यथा दरवर्षी शेतकरी रस्त्यावर उतरणार आणि सरकार आश्वासनांची पुनरावृत्ती करत राहणार, अशीच स्थिती कायम राहील.

एकेकाळी कांद्याने दिल्लीच्या सत्तेला हादरे दिले होते. महाराष्ट्रातील राजकारणातही कांद्याचा प्रश्न अत्यंत संवेदनशील राहिला आहे. त्यामुळे सरकारने या संतापाची तीव्रता ओळखणे गरजेचे आहे. शेतकरी केवळ अनुदान मागत नाही; तो आपल्या श्रमाला न्याय्य मोबदला मागत आहे. त्याच्या घामाला योग्य दाम मिळणे ही केवळ आर्थिक बाब नाही, तर सामाजिक न्यायाचीदेखील गरज आहे. आज महाराष्ट्रातील कांदा उत्पादक बळीराजा पुन्हा एकदा प्रश्न विचारत आहे ''उत्पादन खर्चापेक्षा कमी भाव देऊन शेती टिकणार कशी?'' या प्रश्नाचे उत्तर सरकारने तातडीने आणि प्रामाणिकपणे शोधले नाही, तर उद्याचा असंतोष अधिक व्यापक आणि तीव्र असणार यात शंका नाही.

# भाजी-फळ विक्रेत्यांवर मर्दुमकी गाजवणारे नगरपरिषद प्रशासन भुमाफियांसमोर नपुसंक!

## विभागीय आयुक्तांच्या आदेशाला केराची टोपली-डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरातील मुख्य भाजी मंडई परिसरात रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या भाजीपाला व फळ विक्रेत्यांवर अतिक्रमण हटाव मोहिमेच्या नावाखाली कारवाई करत मर्दुमकी गाजवणारे नगरपरिषद प्रशासन बिंदुसरा नदीपात्रातील मोठ्या अतिक्रमणांबाबत भुमाफियांसमोर नपुसंक असल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिली आहे.**





डॉ. ढवळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, विभागीय आयुक्तांनी दोन वेळा आदेश देऊनही बिंदुसरा नदीपात्रात भराव टाकून नदीचा प्रवाह वळवणे, ओढे बुजवणे तसेच अनाधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आलेली नाही. मात्र दुसरीकडे हातावर पोट भरणाऱ्या भाजी व फळ विक्रेत्यांवर नगरपरिषद प्रशासन मर्दानगी दाखवत असल्याची टीका त्यांनी केली. बिंदुसरा नदीपात्रात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण वाढले असून काही ठिकाणी कचरा टाकून भराव घालणे, प्लॉटिंग करणे, रस्ते तयार करणे आणि बांधकामे उभारणे असे प्रकार सुरू असल्याचा आरोप डॉ. ढवळे यांनी केला आहे. या संदर्भात डॉ. गणेश ढवळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी विभागीय आयुक्तांकडे तक्रार केली होती. त्यानंतर सहाय्यक आयुक्त गट-अ, नगर परिषद प्रशासन विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद येथील डॉ. निलम पाटील यांनी २९ मे २०२३ व २८ जून २०२३ रोजी मुख्याधिकारी, नगरपालिका बीड यांना संबंधित अतिक्रमणांवर ठोस कारवाईचे आदेश दिले होते. मात्र अद्याप कोणतीही प्रभावी कारवाई झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. १९८९ मध्ये बिंदुसरा नदीला आलेल्या पुराचा अनुभव लक्षात घेता नदीकाठच्या पुर नियंत्रण रेषा (निळी रेषा व लाल रेषा) निश्चित करणे आवश्यक असल्याचे डॉ. ढवळे यांनी म्हटले आहे. नगरपरिषद, जिल्हा प्रशासन व पाटबंधारे विभागाला वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. नदीपात्रातील वाढते अतिक्रमण आणि प्रवाहात होत असलेला बदल यामुळे भविष्यात पूरस्थिती निर्माण होऊन जिवित व वित्तहानी झाल्यास त्याला जबाबदार कोण? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

## जिल्हा वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीपकुमार खेडकर यांना पदोन्नती

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा वाहतूक शाखेचे कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीपकुमार खेडकर यांना पदोन्नती मिळाली असून त्यांची आता नाशिक येथे आयुक्तलयात बदली झालेली असून त्यांच्यावर पोलीस विभागासह विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आपल्या शिस्तबद्ध कार्यपद्धती, उत्कृष्ट नियोजन आणि जनसामान्यांशी जपलेल्या समन्वयामुळे खेडकर यांनी अल्पावधीतच वेगळी ओळख निर्माण केली आहे.**



वाहतूक नियंत्रण, स्वतः नगरपालिकेचे सीओ फडसे यांना पत्र देवून अतिक्रमण हटाव मोहीम राबवणे, बुलेट सायलेन्सवर प्रतिबंध लावणे, अपघात प्रतिबंधक उपाययोजना राबवणे तसेच विशेष मोहिमांमध्ये त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. त्यांच्या कार्यकाळात जिल्ह्यात वाहतूक व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यामुळे नागरिकांमध्येही त्यांच्याबद्दल सकारात्मक भावना निर्माण झाली आहे. त्यांच्या पदोन्नतीमुळे जिल्हा वाहतुक शाखेमध्ये आनंदाचे वातावरण असून सहकारी अधिकारी, अंमलदार तसेच विविध सामाजिक संघटनांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. पुढील काळातही त्यांच्या अनुभवाचा आणि कार्यक्षमतेचा पोलीस विभागाला निश्चितच लाभ होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# महसूल पथकासमोरच वाळू चोरी; बीडच्या वाळू माफियांवर 'मोक्का' व 'एमपीडीए' कारवाईची शक्यता-तहसीलदार चव्हाण

**अंबड । प्रतिनिधी**

**गोदावरी नदीपात्रातून होणाऱ्या अवैध वाळू उपशाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आज दिनांक २० मे २०२६ रोजी अंबड महसूल विभाग आणि भूमी अभिलेख विभागाने अत्यंत धाडसी आणि गोपनीय संयुक्त मोहीम राबवली. उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी आणि तहसीलदार विजय चव्हाण यांच्या प्रत्यक्ष नेतृत्वाखाली ५० ते ६० अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या फौजफाट्याने आज दुपारी १२ ते रात्री ८ वाजेपर्यंत वाळू घाटांमधील बेकायदेशीर खड्ड्यांची मोजणी पूर्ण केली. या कारवाईत बीड जिल्ह्यातील गेवराई तालुका प्रशासनालाही पाचारण करण्यात आले होते.**

वाळू माफियांना कारवाईची भनक लागू नये आणि प्रशासकीय हालचालींचे लोकेशन लीक होऊ नये म्हणून सर्व ५० ते ६० अधिकारी-कर्मचारी अत्यंत गोपनीयरीत्या अंबड येथील ए.पी.एम.सी. आवारात जमा झाले. तेथून खाजगी वाहनांद्वारे वेगवेगळ्या दिशांनी मार्गक्रमण करत साष्टपिंपळगाव घाट क्रमांक १ व २ ला चारही बाजूंनी वेढा घालण्यात आला. अचानक झालेल्या या छाप्यामुळे तस्करांची पळापळ झाली. घटनास्थळी भूमी अभिलेख विभागाच्या तीन अद्ययावत पथकांद्वारे 'ईटीएस' मोजणी करून बेकायदेशीर उपशाचे मोजमाप घेण्यात आले. सदर कारवाईची व्याप्ती आणि आंतरजिल्हा सीमा लक्षात घेऊन अंबडचे उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी यांनी बीडच्या उपविभागीय दंडाधिकाऱ्यांना या मोहिमेत समाविष्ट होण्यासाठी विनंती केली होती. काही अपरिहार्य अडीअडचणींमुळे बीडचे उपविभागीय अधिकारी स्वतः उपस्थित राहू शकले नाहीत, मात्र त्यांनी गेवराईचे तहसीलदार आणि संबंधित तलाठ्याला या संयुक्त कारवाईसाठी घटनास्थळी पाठवले. गेवराईचे तहसीलदार आणि त्यांच्या पथकाच्या समक्ष गोदावरी पात्रात सुरू असलेल्या या अवैध उत्खननाचा आणि हद्द उल्लंघनाचा संपूर्ण प्रकार अंबड प्रशासनाने निदर्शनास आणून दिला. कारवाई दरम्यान गंभीर बाब समोर आली की, बीड जिल्ह्यातील गेवराई (सावरगाव) येथील



टेंडरधारकाने जालना जिल्ह्याची सीमा ओलांडून अंबड तालुक्यातील गांधारी घाट च्या हद्दीत घुसखोरी केली आहे. त्याचीही मोजणी करण्यात आलेली आहे. वाळू माफियांनी बीडच्या बाजूने थेट नदीपात्रात बेकायदेशीर रस्ता तयार करून त्याद्वारे मोठ्या प्रमाणावर वाळूची चोरी आणि वाहतूक सुरू केली होती. ही बाब सुद्धा गेवराई तहसीलदार यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. अंबडच्या उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी हा अवैध रस्ता आणि बेकायदेशीर वाहतुकीची गंभीर गेवराईच्या उपविभागीय दंडाधिकाऱ्यांच्या लेखी निदर्शनास आणून दिली आहे. तसेच पिंपळगाव येथील घाट क्रमांक दोन येथील रेती कंत्राटदार यांनी राक्षसभुवन येथून अवैध व विनापरवानगी रस्ता बनवून रेतीची चोरी केल्याचेही दिसून आले तसेच ही बाब सुद्धा गेवराई तहसीलदार यांच्या निदर्शनास समक्ष आणून देण्यात आले. मौजे डोमलगाव घाट क्रमांक १ आणि माळसपिंपळगाव येथे पाहणी सुरू असताना वाळू माफियांचा अत्यंत मुजोर आणि निर्लज्जपणा पाहायला मिळाला. ''नदीत पाणी असल्यामुळे अंबडचे अधिकारी पलीकडे येऊ शकत नाहीत,'' या भ्रमात राहून तस्करांनी थेट उपविभागीय दंडाधिकारी आणि तहसीलदार यांच्यासमोरच लोडरच्या साहाय्याने हायवा ट्रकमध्ये वाळू भरणे सुरूच ठेवले. अंबड प्रशासनाने या संपूर्ण प्रकाराचे अत्यंत अचूक व्हिडिओ चित्रीकरण आणि फोटो*गोळा केले. हे सर्व पुरावे बीड आणि गेवराईच्या उपविभागीय अधिकाऱ्यांना पाठवून संबंधित तस्करांविरुद्ध तात्काळ कडक फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. गेल्या काही दिवसांत केणीचे दोरखंड कापून गुन्हे दाखल केल्याने वाळू माफिया बिथरले आहेत. आज गुन्हे नोंद झाल्यानंतर मुख्य सूत्रधार सुनील बालूर आणि त्याच्या टोळीने फिर्यादी मंडळ अधिकारी बामनावत यांना फोनवरून थेट धमक्या दिल्या आहेत. यावरून वाळू माफियांना कायद्याचा कोणताही धाक उरलेला नाही हे स्पष्ट होते. बीड जिल्हा प्रशासनाला कारवाईसाठी यापूर्वी २ ते ३ स्मरणपत्रे देऊनही ठोस पावले उचलली गेली नाहीत. त्यामुळे जोपर्यंत या संघटित गुन्हेगारांवर मोक्का' किंवा एमपीडीए' सारखी कठोर प्रतिबंधात्मक कारवाई पोलीस आणि महसूल प्रशासनामार्फत केली जात नाही, तोपर्यंत या चोरीला पायबंद बसणे कठीण आहे. यापूर्वीच साष्टपिंपळगाव येथील दोन्ही घाटधारकांना 'कारण दाखवा नोटीस' बजावण्यात आली आहे. भूमी अभिलेख विभागाचा तांत्रिक मोजणी अहवाल प्राप्त होताच दंडाची आकारणी केली जाईल. तसेच व्हिडिओ पुराव्यांच आधारे अजून सविस्तर माहिती घेऊन पुढील सक्त कारवाई करण्यात येणार आहे. कारवाईतील सहभागी पथक: यामध्ये भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक अशोक कोलते, मारुती मिटकरी, श्री तुळशीराम,मुंडे, नायब तहसीलदार एकनाथ भोजने, मंडळ अधिकारी कल्याण माने, कृष्णा येडके, तलाठी सुनील उंबरहंडे, लोणीकर, लव्हाळे, कोतवाल आणि स्थानिक पोलीस पाटील यांनी मोठी मेहनत घेतली. यामध्ये मंडळ अधिकारी कल्याण माने, तलाठी गणेश खरात आणि राजु वैद्य ,शासनाचा महसूल बुडवून पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या वाळू तस्करांच्या पाठीशी उभे राहणाऱ्या प्रत्येकाचा बंदोबस्त केला जाईल. बीड आणि जालना दोन्ही जिल्ह्यांच्या सीमांवर आता २४ तास पाळत ठेवून कडक दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

## पान १ वरून...

### एल निनो च्या सावटात

खतांची गुणवत्ता तपासणे अत्यंत आवश्यक आहे. कुठेही काळाबाजार अथवा गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई झाली पाहिजे,'' असेही त्यांनी नमूद केले. खत अनुदानासाठी केंद्र सरकारने ४१ हजार कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिल्याचा उल्लेख करत चौहान यांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी केंद्र सरकार ठामपणे उभे असल्याचे सांगितले. मात्र, वाढत्या रासायनिक खतांच्या अवलंबित्वामुळे जमिनीचे आरोग्य धोक्यात येत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या शेतीतील काही भागावर तरी सेंद्रिय शेतीचा प्रयोग सुरू करावा, असे आवाहन त्यांनी केले. दरम्यान, यंदाच्या हंगामावर 'एल निनो'चे सावट असल्याने शेती क्षेत्रासमोर आणखी एक मोठे आव्हान उभे राहू शकते, अशी शक्यता त्यांनी व्यक्त केली. भारतीय हवामान विभागाने पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी राहण्याचा अंदाज व्यक्त केला असून, विशेषतः हंगामाच्या मध्यावर पावसात खंड पडू शकतो, असे त्यांनी सांगितले. या परिस्थितीत शेतकऱ्यांनी कमी जोखमीची आणि कमी पाण्यावर येणारी पिके घेण्याचा विचार करावा, असा सल्लाही त्यांनी दिला. केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या वक्तव्यामुळे आगामी खरीप हंगामात खतपुरवठा, हवामान बदल आणि शेती उत्पादन याबाबत चिंता वाढली असून, शेतकरी आणि राज्य सरकारांसमोर नियोजनाचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

-----------

### अजित पवारांच्या राष्ट्रवादीत

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पार्श्वभूमीवर या हालचाली महत्त्वाच्या मानल्या जात आहेत. या संपूर्ण प्रकरणावर अजित पवार गट किंवा शरद पवार गटाकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही. त्यामुळे सुरू झालेल्या चर्चांकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

----------

### देशाच्या डोक्यावर आर्थिक वादळ

अकाऊंटवर मेलोनी यांच्यासोबत कोलॅब करत एक व्हिडीओ शेअर केला आहे. यामध्ये पंतप्रधान मोदी हे इटलीच्या पंतप्रधानांना त्यांच्या नावाशी सार्धम्य असलेली मेलेडी चॉकलेटस् देताना दिसत आहेत. या व्हिडीओमध्ये दोघेही खळाळून हसताना पाहायला मिळत आहेत. याच व्हिडीओवरुन काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर टीका केली आहे. राहुल गांधी यांनी बुधवारी रायबरेली येथे झालेल्या सभेतही पंतप्रधान मोदी यांच्यावर टीकास्त्र सोडले. आता अदानी आणि अंबानी मोदी देशाला वाचवू शकत नाहीत. आता देशातील शेतकरी, मजूर, तरुण देश वाचवू शकतात, पण यांनी तुमचे हात बांधून टाकले आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील नोकऱ्या संपवल्या आहेत. पंतप्रधान मोदी यांनी आता चॉकलेटं वाटत फिरण्याऐवजी शेतकऱ्यांना खतपुरवठा कसा होईल, याकडे पाहायला हवे. अंबानी देशातील देशातील तेल बाहेर निर्यात करत आहेत. हे तेल लोकांना हवे आहे. हे तेल जनतेला द्या, असे राहुल गांधी यांनी म्हटले.

---------

### भोंदू अशोक खरातला

नॉमिनी का करण्यात आले, याबद्दल मला काहीही माहिती नाही. आता तपास झाला आहे. मी आणि आवारे जेलमध्ये आहोत, एवढेच मला माहिती आहे, अशी कबुली भोंदू अशोक खरात याने न्यायालयात दिली. समता पतसंस्थेतील संशयास्पद आर्थिक गैरव्यवहार आणि खात्यांमधील कथित संशयास्पद रकमेप्रकरणी न्यायालयात सुनावणी पार पडली. यावेळी न्यायाधीशांनी तुमच्यावर नेमके काय आरोप ठेवण्यात आले आहेत, हे तुम्हाला समजतेय का? या प्रश्नानंतर खरात याने न्यायालयात आपली बाजू मांडली. जर सर्व काही नियमानुसार होते, तर तुम्हाला या सगळ्या अकाउंटला नॉमिनी (वारसदार) करण्याचे कारण काय होते? या प्रश्नावर खरात म्हणाला. त्याबद्दल मला खरोखर काहीही माहिती नाही.

-------

### वाल्मीक कराडची प्रकृती खालावली;

आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणाची सुनावणी बीडच्या विशेष न्यायालयात सुरू आहे. गेल्या वर्षभरापासून वाल्मीक कराड बीड कारागृहात बंद आहे. याआधीही वाल्मीक कराडने छातीत दुखणे, अशक्तपणा आणि इतर शारीरिक तक्रारी केल्या होत्या. त्यामुळे त्याला अनेकदा उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मागील काही दिवसांपासून लघवी करताना त्रास होत असल्याची तक्रार त्याने कारागृह प्रशासनाकडे केली होती. त्यानंतर कारागृहातच प्राथमिक उपचार सुरू करण्यात आले आणि त्याला सलाईन देण्यात आले. वाल्मीक कराडला 'युरोसिस्टायटिस' प्रकारचा संसर्ग झाल्याची चर्चा सुरू आहे. कारागृहात उपचार सुरू असूनही प्रकृतीत अपेक्षित सुधारणा होत नसल्याने त्याला अंबाजोगाई येथील रुग्णालयात हलवण्याची तयारी सुरू असल्याचे सांगितले जात आहे. जिल्हा रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने कारागृहात जाऊन त्याची वैद्यकीय तपासणी केली. बीड जिल्हा रुग्णालयात यूरोलॉजिस्ट उपलब्ध नसल्याने पुढील उपचारासाठी त्याला हलवण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

----------------

### धाराशिव-बीड-लातूर विधानपरिषदेसाठी

अधिक मतदार उपलब्ध या नियमाच्या आधारे निवडणूक आयोगाने हा मतदारसंघ निवडणुकीसाठी पात्र ठरवला आहे. २०१८ च्या विधानपरिषद निवडणुकीत सुरेश धस यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठिंब्याने मैदानात उतरलेले अपक्ष उमेदवार अशोक जगदाळे यांचा ७२ मतांनी पराभव केला होता. यावेळीही भाजपसाठी वातावरण अनुकूल मानले जात असले तरी पक्षांतर्गत स्पर्धेमुळे समीकरणे बदलू शकतात. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख १ जून आहे. १८ जून रोजी मतदान होणार असून २२ जूनला मतमोजणी पार पडणार आहे. दरम्यान, जळगावमध्ये तब्बल १० वर्षांनंतर विधानपरिषद निवडणूक होत असून महायुतीत उमेदवारीसाठी अनेक इच्छुक पुढे आले आहेत. भाजपकडून डॉक्टर केतकी पाटील,अमोल शिंदे, नंदकुमार अडवाणी व शिवसेना शिंदे कडून मंत्री गुलाबराव पाटलांचे पुत्र प्रताप पाटील यांचे नाव चर्चेत आहेत.

---------------

### मागासवर्गीय जातींमधील लोकांची

सुधाकर गुम्मुला यांनी वैयक्तिकरीत्या दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी सुरू होती. हे प्रकरण धोरणात्मक निर्णयाच्या कक्षेत येत असल्याचे सांगत खंडपीठाने यात हस्तक्षेप करण्यास नकार दिला. स्वतः बाजू मांडणाऱ्या याचिकाकर्त्याने असा युक्तिवाद केला की, ''जातीच्या डेटाचा (माहितीचा) गैरवापर होऊ शकतो, विशेषतः जर ही माहिती कॉर्पोरेट कंपन्या आणि राजकीय नेत्यांच्या हाती लागली तर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. जातीचा डेटा गोळा करण्याचे कोणतेही सबळ कारण नाही. सरकारकडे आधीच मोठ्या प्रमाणावर डेटा उपलब्ध आहे.'' हा युक्तिवाद फेटाळून लावत सरन्यायाधीश म्हणाले, ''जनगणना जातीवर आधारित असावी की नाही, हे सर्व धोरणात्मक निर्णय आहेत. यामध्ये चुकीचे काय आहे? कोणत्याही काळातील सरकारला हे माहीत असणे गरजेचे आहे की मागासवर्गीयांची संख्या किती आहे आणि त्यांच्यासाठी कोणत्या प्रकारच्या कल्याणकारी योजना राबवल्या पाहिजेत. हा पूर्णपणे धोरणात्मक अधिकार क्षेत्रातील विषय आहे.'' याचिका फेटाळून लावताना न्यायालयाने स्पष्ट केले की, जातीनिहाय गणना करणे हा सरकारचा धोरणात्मक निर्णय आहे.

----------

### माटेगावकराची साखळी

मधील युनिक कोचिंग क्लासेसचे संचालक हर्षल केकन यांच्यावर देखील दुसऱ्या एका क्लासेस चालकांनी गोळीबार केला होता. या प्रकरणी पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा नोंद करण्यात आला. हा गोळीबार देखील व्यावसायिक वादातूनच झाला होता, हे पुन्हा एकदा निष्पन्न झाले आहे. दुसरी बाब म्हणजे आरसीसीचे संचालक यांच्यापर्यंत काही नीट पेपर फुटी प्रकरणाची कढी मिळते का माटेगावकर यांना ताब्यात घेतल्यानंतर नीट पेपर फुटी प्रकरणातील जो सूत्रधार सुरुवातीला पुढे आला ते प्राध्यापक कुलकर्णी बीड येथील असल्याने त्यांची लिंक बीड मधील काही क्लासेस चालका सोबत आहे का ? याचा देखील बारकाईने आता सीबीआय तपास करत असल्याचे दिसत आहे. शिक्षणाचा बाजार मांडणाऱ्या या प्राध्यापका विषयी राज्यासह देशभरातून संतापाची लाट उसळत आहे. मेडिकल आणि इंजिनिअरिंग प्रवेशाची हमी लाखो रुपये देऊन घेणाऱ्या अशा क्लासेस चालकांना फासावरं लटकवले पाहिजे, अशाही भावना पालक वर्गांमधून व्यक्त केल्या जात आहेत. खासगी क्लासिक क्षेत्रात प्रवेश करून आपला दबदबा निर्माण केला तर काहींनी राजकीय आधार घेत दबावतंत्राचा वापर करत घूसखोरी केली. यावर कडक निर्बंध लादले पाहिजेत, अन्यथा शिक्षणाचा हा बाजार आणखी फोफावण्यास वेळ लागणार नाही. नवी पिढी चांगली घडवायची असेल तर या क्षेत्रात नव्या कायद्याची गरज आहे.

----------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. २१ मे २०२६
३

## थोडक्यात

### अज्ञात वाहनाच्या धडकेत माजलगावच्या दोन सख्ख्या भावाचा मृत्यू

माजलगाव । प्रतिनिधी

पाथरी -ढालेगाव परिसरात राष्ट्रीय महामार्गावर अज्ञात वाहनाने मोटरसायकलला दिलेल्या धडकेत माजलगाव तालुक्यातील रेणापुरी येथील दोन तरुण सख्या भावांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दि १८ मे सोमवार रोजी रात्री ११:०० वाजण्याच्या सुमारास घडली असुन या घटनेमुळे रेणापूरी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.मृत तरुणांचे नावे रवींद्र शिवाजी गडसिंगे (वय २७) व विशाल शिवाजी घडशिंगे (वय २४) अशी असून, दोघेही रेणापूरी ता. माजलगाव येथील रहिवासी होते. मिळालेल्या माहितीनुसार, दोघे भाऊ मोटारसायकल वरून क्रमांक (एम.एच.४४ ए.बी.२६२६) जात असताना ढालेगाव-पाथरी दरम्यान राष्ट्रीय महामार्गावर त्यांच्या मोटर सायकल ला अज्ञात वाहनाने जोराची धडक दिली. अपघात इतका गंभीर होता की दोघांचाही जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेमुळे रेणापूरी गावावर शोककळा पसरली असून, अज्ञात वाहनाचा तपास संबंधित पोलिसांकडून सुरू आहे.



**जयसिंग सोळंकेंनी अपघातग्रस्तांना केली मदत**

संबंधित अपघात ज्यावेळेस झाला त्यावेळी माजी जिल्हा परिषद बांधकाम सभापती जयसिंग सोळके हे पाथरी कडून माजलगाव कडे येत होते. यावेळी झालेल्या अपघाता जवळ त्यांनी गाडी थांबून अपघात ग्रस्त व्यक्तींना तातडीने जवळच्या रुग्णालयात हलवले. परंतु यापूर्वीच एक जणांने जागेवर प्राण सोडला होता तर दुसरा हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान मृत पावला.



### दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा संपन्न

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

मार्कवर नव्हे तर गुणांवर भर द्या शिक्षण हीच यशाची खरी गुरुकिल्ली आहे!असा प्रेरणादायी संदेश देत धोंडीराम रोडे गुरुजी प्रतिष्ठानच्या वतीने भीमनगर परिसरातील दहावी व बारावी परीक्षेत उत्तम यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्ण सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा हा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमात वैद्यनाथ विद्यालयाचे आदर्श शिक्षक सुनील देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शिक्षणाच्या जोरावर कोणत्याही क्षेत्रात मोठे यश संपादन करता येते. मेहनत, जिद्द आणि सातत्य हेच यशाचे सूत्र आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष वैजनाथ तात्या जगतकर उपस्थित होते. तसेच समाजसेवक तथा युवा नेते भारत ताटे, सूत्रसंचालक आनंद तूपसमुद्रे, राहुल ताटे, बापू ताटे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशामुळे पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानचे प्रमुख मिथुन रोडे, आकाश साळवे व सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव म्हणजे समाजाच्या उज्ज्वल भविष्यास बळ देणे असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

## जिल्ह्यात कृषी निविष्ठांची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करावी -जिल्हाधिकारी

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना बियाणे, खते व इतर कृषी निविष्ठा मुबलक आणि गुणवत्तापूर्ण उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने चोख नियोजन करावे. तसेच जिल्ह्यात कृषी निविष्ठांची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यावर कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित कृषी विभागाच्या जिल्हास्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, प्र.जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, कृषी उपसंचालक दादाराव जाधव यांच्यासह संबंधित विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, कृषी निविष्ठांची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या तसेच विशिष्ट कंपनीचे उत्पादन घेण्याची शेतकऱ्यांना सक्ती करणाऱ्या दुकानदारांवर कठोर कारवाई करावी. कृषी विभागाच्या भरारी



बीड जिल्हा खरीप हंगामपूर्व आढावा बैठक संपन्न

पथकांनी वेळोवेळी कृषी केंद्रांना भेट देऊन तपासणी करावी, तसेच टोल फ्री क्रमांकावर प्राप्त तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. बोगस बियाणांची विक्री रोखण्यासाठी विशेष दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी या बैठकीत दिल्या. कृषी केंद्र दुकानदारांनी बियाणे खरेदीसाठी शेतकऱ्यांवर कोणतीही अट लादू नये, अन्यथा संबंधितांविरोधात कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. यावेळी जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी बीड जिल्ह्यात गायरान जमिनीसह इतर ठिकाणी चारा लागवडीचे क्षेत्र वाढविण्यावर भर देण्यास सांगितले. तसेच पोकरा योजनेअंतर्गत रेशीम उत्पादनासाठी क्षेत्रवाढ करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. पीक कर्ज वितरणाबाबतही त्यांनी बँक अधिकाऱ्यांना सूचना देत जिल्ह्यात १०० टक्के पीक कर्ज उद्दिष्ट पूर्ण करण्यावर भर दिला. कर्ज वितरणात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित केली जाईल, असे ही त्यांनी सांगितले. सुरुवातीस प्रास्ताविकात आत्माचे प्रकल्प संचालक तथा प्र. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी खरीप हंगाम जून २०२६ पासून सुरू होत असल्याची माहिती दिली. यात बीड जिल्ह्यात १०.६८ लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्र असून सरासरी ८.८५ लाख हेक्टर क्षेत्रावर खरीप लागवड केली जाते. असे सांगून त्यांनी बि-बियाणांसह खत साठ्याची माहिती, पिक विमा, पिक कर्ज, मृदा तपासणी, शेतकरी अनुदान वाटप याची संगणकीय सादरीकरणाद्वारे माहिती दिली. तसेच बदलत्या हवामानाशी सुसंगत शेतीसाठी पोकरा योजनेतून शेतकऱ्यांना सक्षम करण्याचे प्रयत्न सुरू असून उत्पादनवाढीसाठी विविध नाविन्यपूर्ण प्रयोग राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

## आ.सुरेश धस यांच्या संकल्पनेतून रोटी-ईमनगाव प्रकल्पातील गाळ उपसा; तलावाची पाणी साठवण क्षमता वाढणार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील रोटी-ईमनगाव प्रकल्पातील तलावाची पाणी साठवण क्षमता वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गाळ उपसा करण्यात येत असून हे काम लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या संकल्पनेतून सुरू असल्याची माहिती केळसांगवीचे सरपंच अजित घुले यांनी दिली.



उन्हाळ्याच्या दिवसांत बहुतांश तलावांमधील पाणीसाठा कमी होत असतो. तलावात वर्षानुवर्षे साचलेल्या गाळामुळे पाणी साठवण क्षमता घटते. ही समस्या लक्षात घेऊन तलावातील गाळ काढून जलसाठा वाढवण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. गेल्या आठ दिवसांपासून या ठिकाणी युद्धपातळीवर काम सुरू असून हजारो ब्रास गाळ उपसण्यात आल्याचे सरपंच अजित घुले यांनी सांगितले.

तलावातून काढण्यात आलेला सुपीक गाळ परिसरातील पंधरा गावांतील तसेच इतर भागांतील शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीची उत्पादकता वाढवण्यासाठी उपलब्ध करून दिला जात आहे. या गाळामुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होत असून शेतकऱ्यांना मोठा आर्थिक लाभ होणार आहे. कोट्यवधी रुपयांच्या किमतीचा हा गाळ अत्यंत कमी दरात शेतकऱ्यांना दिला जात असल्याने शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे.

या संपूर्ण उपक्रमासाठी आवश्यक खर्च लोकवर्गणीतून उभारण्यात येत असल्याचेही सरपंच अजित घुले यांनी स्पष्ट केले. रोटी-ईमनगाव प्रकल्पालगत असलेल्या रोटी पिंपरी गावालाही या तलावाचा मोठा लाभ होत असून भविष्यात सिंचन व पिण्याच्या पाण्याची उपलब्धता अधिक सक्षम होणार आहे. आष्टी शहर व मुर्शिदपूर शहराला देखील या तलावातून पाणीपुरवठा केला जातो. गाळ उपशाच्या कामासाठी दररोज दहा चाकी टिप्पर, मोठ्या क्षमतेच्या पोकलेन आणि जेसीबी मशिन्स रात्रंदिवस कार्यरत असल्याची माहिती बाळासाहेब बोराडे यांनी दिली. शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी आमदार सुरेश धस सातत्याने प्रयत्नशील असून त्यांच्या पुढाकारामुळे जलसंधारण आणि शेती विकासाला चालना मिळत असल्याचेही त्यांनी सांगितले.

या उपक्रमामुळे तलावाची पाणी साठवण क्षमता वाढण्यासोबतच परिसरातील भूजल पातळी सुधारण्यास मदत होणार आहे. तसेच शेतकऱ्यांना सुपीक गाळ उपलब्ध झाल्याने शेती उत्पादनात वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## पान ६ वरुन...

### दिव्यांगांच्या अडचणी सोडवा

यांनी आपल्या पत्रात स्पष्ट केले आहे. खा.सोनवणे यांनी आपल्या पत्रात जिल्हा रुग्णालयामध्ये दिव्यांग बांधवांच्या युडीआयडी कार्डला आधार कार्ड लिंक करण्यासाठी एक स्वतंत्र आणि विशेष कक्ष तातडीने सुरू करण्यात यावा, दिव्यांगांना बीड शहरात येणे त्रासदायक ठरत असल्याने, तालुकास्तरावर विशेष शिबिरांचे (रस्ङ्गीं' उेंस्र२) आयोजन करून प्रलंबित प्रकरणे जागेवरच निकाली काढण्यात यावीत, दिव्यांग प्रमाणपत्र देणे,युडीआयडी नोंदणी करणे आणि दुरुस्ती प्रक्रियेला गती देण्यासाठी जिल्हा रुग्णालयात आवश्यकतेनुसार अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे. ऑनलाईन प्रणालीमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे दिव्यांग बांधवांची अडवणूक होते, यासाठी तांत्रिक अडचणी दूर करणारे एक स्वतंत्र मदत केंद्र सुरू करावे. जिल्ह्यातील एकही दिव्यांग लाभार्थी तांत्रिक त्रुटींमुळे किंवा माहितीअभावी शासनाच्या योजनांपासून वंचित राहणार नाही, याची प्रशासनाने विशेष दक्षता घ्यावी, असे निर्देश दिले आहेत.

**अहवाल सादर करण्याचे आदेश**

खा.सोनवणे यांनी केवळ निर्देश देऊन न थांबता, या संपूर्ण प्रकरणावर जिल्हा शल्य चिकित्सकांनी केलेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल लेखी स्वरूपात तातडीने आपल्या कार्यालयाकडे सादर करावा, असेही पत्राच्या शेवटी निक्षून सांगितले आहे. खा.सोनवणे यांच्या या आक्रमक पावित्र्यामुळे आता बीड जिल्हा रुग्णालय प्रशासन आणि आरोग्य यंत्रणा खडबडून जागी झाली असून, येत्या काही दिवसांत जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

### पाटोदा वाघीरा फाट्यावर

वाघीरा फाट्याजवळ त्याच्या दुचाकीला इनोव्हा कारने उडवले. ही धडक एवढी भीषण होती की संदिपानचा जागीच अंत झाला आणि त्याचे देशसेवेचे स्वप्न कायमचे अधुरे राहिले. काही दिवसांपूर्वीच ज्या घरात मुलाच्या लष्करातील निवडीचा आनंद साजरा होत होता, तिथे आज संपूर्ण शोककळा पसरली आहे. आई-वडिलांचा अभिमान अश्रूंमध्ये बदलला असून संपूर्ण गावावर तीव्र शोककळा पसरली आहे.

### गोदावरी नदी पात्रात पाणी

शिवसैनिक व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांच्या विविध मागण्या मांडण्यात आल्या. गोदावरी नदी पात्रात तातडीने पाणी सोडावे, शेतीसाठी नियमित पाणीपुरवठा करावा, कोरडवाहू भागातील शेतकऱ्यांना विशेष मदत जाहीर करावी, जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी तसेच पाणी प्रश्नाकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासनाविरोधात कठोर भूमिका घ्यावी, अशा मागण्या करण्यात आल्या.

रस्ता रोको आंदोलनामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. यावेळी गेवराई तहसीलदार संदीप खोमणे तसेच गेवराई पोलीस निरीक्षक पवार साहेब यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन शिवसेनेचे निवेदन स्वीकारले. प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन शांतेत मागे घेऊन यश आले. या आंदोलनासाठी खामगाव, नागझरी, नांदर, सावळेश्वर, माळस पिंपळगाव, गंगावाडी, राक्षसभुवन, पांचाळेश्वर, शहागड, वाळकेश्वर आदी गावांतील शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले होते.

### धाराशिव-लातूर-बीड स्थानिक

सातत्याने काम केले आहे. ग्रामीण भागातील युवकांना संघटित करण्याचे काम त्यांनी प्रभावीपणे केले असून अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. कार्यकर्त्यांशी सातत्यपूर्ण संपर्क, सर्वसामान्य नागरिकांशी असलेला संवाद आणि संघटन उभारणीची क्षमता यामुळे त्यांना युवा वर्गाचा मोठा पाठिंबा मिळत आहे. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघामध्ये विजय मिळवण्यासाठी संघटन कौशल्यासोबतच स्थानिक पातळीवरील मजबूत संपर्क अत्यंत महत्त्वाचा असतो. जयदत्त भय्या धस यांना बीड, धाराशिव आणि लातूर या तिन्ही जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांचा चांगला प्रतिसाद मिळत असून त्यांची उमेदवारी जाहीर झाल्यास भाजपची ताकद आणखी वाढेल, असेही ड. प्रकाशदादा कवठेकर यांनी नमूद केले. भाजपने आगामी निवडणुकीत युवा नेतृत्वाला प्राधान्य देत जयदत्त भय्या धस यांच्यासारख्या अभ्यासू, संयमी आणि कार्यक्षम नेतृत्वावर विश्वास दाखवावा. त्यांच्या उमेदवारीमुळे पक्ष संघटन अधिक मजबूत होईल आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील भाजपचे वर्चस्व वाढण्यास मदत होईल, असा विश्वासही ड. प्रकाशदादा कवठेकर यांनी व्यक्त केला. शेवटी त्यांनी भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाने स्थानिक कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेऊन युवा नेते जयदत्त भय्या धस यांना अधिकृत उमेदवारी जाहीर करावी, अशी मागणी केली.

### ऑनलाईन औषध विक्री बंद

अडचणींबाबत शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला. औषध विक्रेत्यांच्या मागण्यांकडे केंद्र आणि राज्य शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

या आंदोलनात अरुण धनवडे, संजय वर्धमाने, शरद वांढरे, सोनटक्के यांच्यासह असोसिएशनचे पदाधिकारी आणि इतर सदस्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

आष्टी तालुक्यातील मेडिकल व्यावसायिकांनी एकजुटीने बंद पाळत आपल्या मागण्यांसाठी ठाम भूमिका घेतल्याने या आंदोलनाला व्यापक प्रतिसाद मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले.


## 'नशा' व 'व्यथा' या एकांकिकांतून समाजाचे वास्तव प्रतिबिंबित

### शिव बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या नाट्य स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**माजलगांव । प्रतिनिधी**

**शिव बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या वतीने तसेच संस्कृती मंत्रालय, दिल्ली यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या भव्य नाट्य स्पर्धेला रसिक प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. समाजातील विविध समस्या, बदलती मानसिकता आणि वास्तववादी घटनांवर भाष्य करणाऱ्या 'नशा' व 'व्यथा' या एकांकिकांनी प्रेक्षकांची मने जिंकली.**

माजलगांव येथील व्यंकटेश हॉटेल येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात सामाजिक आशय, संस्कृतीचे जतन आणि कलावंतांच्या सर्जनशीलतेचे प्रभावी दर्शन घडले. भारताला संस्कृती आणि नाट्य चळवळीचा समृद्ध वारसा लाभला असून, तो वारसा जपण्याचे महत्त्वपूर्ण कार्य अशा नाट्य स्पर्धांमधून होत असल्याचे मान्यवरांनी यावेळी सांगितले.



'नशा' या एकांकिकेतून व्यसनाधीनतेमुळे उद्ध्वस्त होणारे कुटुंब आणि समाजावर होणारे दुष्परिणाम प्रभावीपणे मांडण्यात आले. तर 'व्यथा' या एकांकिकेतून सर्वसामान्यांच्या मनातील वेदना, संघर्ष आणि सामाजिक परिस्थितीचे वास्तव चित्रण साकारण्यात आले. कलाकारांच्या दमदार अभिनयामुळे प्रेक्षक भावूक झाले.कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी कला आणि नाटक ही समाजप्रबोधनाची प्रभावी माध्यमे असल्याचे सांगत कलाकारांचे कौतुक केले. समाजामध्ये घडणाऱ्या घटनांचे वास्तव एकांकिकांच्या माध्यमातून ठळकपणे मांडले जाते आणि त्यामुळे समाजाचे प्रतिबिंब सतत उमटत राहते,असे मतही व्यक्त करण्यात आले. या नाट्य स्पर्धेमुळे स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळाले असून सांस्कृतिक चळवळीला नवसंजीवनी मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शिव बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात आले.

## गुंगीचे औषध देऊन धाडसी चोरी; सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील तवलवाडी गावामध्ये मंगळवारी मध्यरात्री गुंगीचे औषध देऊन धाडसी चोरी झाल्याची घटना घडली असून, यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. गावातील कपडे ड्रायक्लिनिंग व्यवसाय करणारे गौरव केरळकर यांच्या राहत्या घरी अज्ञात चोरट्यांनी ही चोरी केली.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री चोरट्यांनी घरातील दोन महिला आणि एका पुरुषाला गुंगीचे औषध देऊन बेशुद्ध केले. त्यानंतर घरातील महिलांच्या अंगावरील घरातील सोन्याचे दागिने ३ तोळे तसेच रोख रक्कम १लाख ५० हजार चोरून नेली. सकाळी घरातील सदस्यांना हा प्रकार लक्षात आल्यानंतर एकच गोंधळ उडाला. गेल्या काही दिवसांपासून आष्टी शहर व तालुक्यात चोरी आणि महिलांच्या अंगावरील दागिने हिसकावून नेण्याच्या घटना वाढल्या आहेत. रस्त्यावर प्रवास करत असताना महिलांचे दागिने तोडून पलायन करण्याच्या अनेक घटना ताज्या असतानाच तवलवाडी गावातील ही धाडसी घरफोडी घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. अज्ञात चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरविली असून, परिसरातील संशयित हालचालींची चौकशी सुरू आहे.

या घटनेमुळे तवलवाडी गावासह संपूर्ण आष्टी तालुक्यात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांनी रात्रीच्या वेळी अधिक सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## आम्ही पोलीस आहोत अशी बतावणी करत दिवसाढवळ्या एकास लुटले

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील धनगर जवळका रोडवर दिवसाढवळ्या एका प्रवाशाला अडवून, 'आम्ही पोलीस आहोत' अशी बतावणी करत १ लाख २० हजार रुपये किमतीच्या १७ ग्रॅमच्या सोन्याच्या दोन अंगठ्या चोरट्यांनी लंपास केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे पाटोदा परिसरात आणि धनगर जवळका भागात घबराटीचे वातावरण पसरले आहे.याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, वानेवाडी येथील रहिवासी बाबासाहेब दशरथ येवले हे दि. १८ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास पाटोद्याहून वानेवाडीकडे आपल्या मोटरसायकलवरून जात होते. धनगर जवळका येथील वळणावर, सौताडा जाणारे रोडवरील 'कठीणात' या ठिकाणी मागून दोन मोटरसायकलवर चार अनोळखी व्यक्ती आल्या. त्यांनी हॉर्न वाजवून बाबासाहेब येवले यांना थांबवले.आम्ही पोलीस आहोत, तुम्ही हातात सोन्याच्या अंगठ्या घालून कुठे चाललात? पुढे चोऱ्या होतात, अशी बतावणी या भामट्यांनी केली. त्यानंतर त्यांनी येवले यांच्या तोंडात रुमाल घालून, त्यांच्या हातातील १ लाख २० हजार रुपये किमतीच्या १७ ग्रॅमच्या दोन सोन्याच्या अंगठ्या काढून घेतल्या. त्या बदल्यात बनावट (नकली) अंगठ्यांची पुडी त्यांच्या हातात देऊन हे चारही चोरटे चुंबळीफाट्याकडे वेगाने पसार झाले.आपली फसवणूक आणि लूट झाल्याचे लक्षात आल्यानंतर बाबासाहेब येवले यांनी पाटोदा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पाटोदा पोलीस करत आहेत.

## आदित्य अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात बारामती, महाबळेश्वरसह कोकणातील अन्न कंपन्यांना भेटी

बीड । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ अंतर्गत असलेल्या बीड शहरातील आदित्य अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेली शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न झाली. तिसऱ्या व पाचव्या सत्रातील विद्यार्थ्यांनी या सहलीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. २७ एप्रिल ते १ मे या पाच दिवसांच्या कालावधीत ही सहल महाराष्ट्रातील विविध औद्योगिक आणि प्रेक्षणीय स्थळांना भेटी देत यशस्वीरित्या पार पडली.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य पी. एस.



राठोड यांनी अन्नतंत्रज्ञानाच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योग जगताचा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अनुभव घेता यावा, या उद्देशाने या सहलीचे आयोजन करण्यात आले होते. पाच दिवसांच्या या दौऱ्यात विद्यार्थ्यांनी राज्यातील आघाडीच्या अन्न प्रक्रिया कंपन्यांना भेटी देऊन तेथील कामकाजाची माहिती घेतली. यामध्ये आय.एन.आय. फार्म (बारामती), मेप्रो फूड्स प्रायव्हेट लिमिटेड (वाई, महाबळेश्वर) आणि रत्नागिरी येथील गदरे मरीन एक्स्पोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपन्यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी या ठिकाणी अन्न प्रक्रिया, पॅकेजिंग, शीतगृहांचे व्यवस्थापन आणि गुणवत्ता नियंत्रण याविषयीचे तांत्रिक ज्ञान प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे समजून घेतले.विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालण्यासोबतच विरंगुळा मिळावा म्हणून या सहलीत महाराष्ट्रातील विविध ऐतिहासिक, धार्मिक व प्रेक्षणीय स्थळांचाही समावेश करण्यात आला होता. मोरगावचा मयुरेश्वर, जेजुरीचा खंडोबा, नारायणपूरचे एकमुखी दत्त मंदिर, प्रति बालाजी, काशी विश्वेश्वर मंदिर, महागणपती मंदिर, जोतिबा आणि पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिराला विद्यार्थ्यांनी भेट देऊन दर्शन घेतले. तसेच ऐतिहासिक गडकिल्ल्यांचे वैभव अनुभवण्यासाठी विद्यार्थ्यांनी रायगड किल्ल्याला भेट दिली. महाबळेश्वरचे विलोभनीय पॉईंट्स, कोकणातील प्रसिद्ध गणपतीपुळे आणि आरे-वारे समुद्राचा विस्तीर्ण किनारा पाहून विद्यार्थी सुखावले. सहल यशस्वी करण्यासाठी प्रा. गुजर, प्रा. पुंडे, प्रा. मोराळे, प्रा. मिसाळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून, त्यांना प्रत्यक्ष क्षेत्रातील कामाचा अनुभव मिळणे गरजेचे आहे. या सहलीमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास नक्कीच वाढेल.

-डॉ. आदिती सारडा, संचालिका, आदित्य शिक्षण संस्था

# ऊस बिलाचे १३० कोटी रुपये थकविले

## सोलापूरच्या गोकूळ कारखान्याची मालमत्ता जप्तीचे आदेश


सोलापूर : मागील दोन हंगामात शेतकऱ्यांच्या उसाचे पैसे थकविणाऱ्या दक्षिण तालुक्यातील धोत्री येथील गोकुळ शुगर या साखर कारखान्यांवर आरआरसी कारवाई साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी केली आहे. विशेष म्हणजे सरलेल्या (२०२५-२६) या वर्षाच्या १३० कोटी ४६ लाख २५ हजार रुपये ऊस बिल थकबाकी व त्यावरील १५ टक्के व्याजाची रक्कम देण्याचे आदेशात म्हटले आहे.

गोकुळ साखर कारखान्याने मागील गाळप हंगामात प्रति दिन तीन हजार ५०० प्रमाणे १०५ दिवस गाळप हंगाम घेतला. त्याप्रमाणे तीन लाख ६७ हजार ५०० मेट्रिक टन ऊस गाळप केल्याचे गृहीत धरून ऊस बिलाची थकबाकी १३० कोटी रुपये गृहीत धरली आहे. कारखान्यांची बँकेला तारण नसलेली साखर, मोलॅसिस व बगॅसची विक्री करून ऊस बिल रक्कम देण्याचे आदेशात म्हटले आहे. साखर साठा बँकेला तारण दिली असल्यास तारण दिली नसलेली जंगम व स्थावर मालमत्ता जप्त करून या मालमत्तेवर दस्तऐवजामध्ये शासनाच्या नावाची नोंद करावी, असे आदेशात म्हटले आहे.



या मालमत्तेची लिलावातून विक्री करून या रकमेतून ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ चे कलम ३ (९) नुसार कारवाई करावी असे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांच्या आदेशात नमूद केले आहे. मागील हंगामातील ऊस गाळप थकबाकीसाठी गोकुळ शुगर कारखान्यांवर आर.आर.सी. ची कारवाई झालेला राज्यातील पहिला साखर कारखाना आहे. याच गोकुळ शुगर या साखर कारखान्यांकडे २०२४-२५ या वर्षीचे एक कोटी ९९ लाख रुपये ऊस उत्पादकांची थकबाकी असल्याचे साखर आयुक्त कार्यालयाच्या दप्तरी नोंद आहे. ही थकबाकी न देताच मागील वर्षी साखर कारखाना सुरू केल्याचे दिसत आहे. मागील थकबाकी दिली नसल्याने गत वर्षी साखर हंगाम सुरू करण्यास परवाना दिला नव्हता.

# मका लागवड, संपूर्ण माहिती जाणून घ्या



धान आणि गहू नंतर मका हे भारतातील तिसरे महत्त्वाचे पीक आहे. ज्याचा वापर अन्नपदार्थ, हिरवा चारा आणि औद्योगिक कामांमध्ये कच्चा माल म्हणून केला जातो. मका हे सर्व तृणधान्य पिकांच्या तुलनेत सर्वाधिक उत्पादकता (उत्पादन/हेक्टर) असलेले अन्न पीक आहे. जागतिक स्तरावर, मक्याला अन्नधान्याची राणी म्हणून ओळखले जाते कारण त्यात सर्व तृणधान्य पिकांमध्ये अनुवांशिक उत्पन्नाची क्षमता सर्वाधिक आहे. हे पीक विविध कृषी-हवामान परिस्थितीशी जुळवून घेत चांगले उत्पादन देण्यास सक्षम आहे. जगातील १७० देशांमध्ये सुमारे २०६ दशलक्ष हेक्टर क्षेत्रात या पिकाची लागवड केली जाते.

लागवड कालावधी : मका पिकाच्या पेरणीसाठी २५ जून ते २० जुलै हा इष्टतम कालावधी आहे. वालुकामय चिकणमाती ते चिकणमाती चिकणमातीपर्यंतच्या माती प्रकारात मका यशस्वीपणे पिकवता येतो. सामान्य सह उच्च पाणी धारण क्षमतेसह चांगले सेंद्रिय पदार्थ असलेली माती उच्च उत्पादकतेसाठी चांगली मानली जाते. ओलावा संवेदनशील पीक असल्याने, विशेषतः जास्त ओलावा आणि खारटपणा असलेल्या जमिनीत मका लावू नका.

आंतर मशागत : शेत तयार करण्यासाठी नांगरणी १२-१५ सें.मी. हे १० सेमी खोलीवर केले पाहिजे, जेणेकरून सर्व अवशेष आणि खते जमिनीत शोषली जातील. या व्यायामासाठी मोल्ड-बोल्ड नांगर अधिक योग्य आहे. उसाला चार नांगरणी केल्यावर माती भुसभुशीत होते. त्यानंतर रायडरच्या मदतीने विर बनवता येते.

लागवड पद्धत : पूर्व-पश्चिम दिशेला चाळ बनवा आणि ४-५ सेंटीमीटर खोल पेरणी बियांच्या दक्षिणेकडे करा. नंतर खुडाच्या उंचीपर्यंत पाणी टाकल्याने साचण्याचे प्रमाण अधिक व जलद होते.

रोगांपासून संरक्षण : पिकाचे रोगांपासून संरक्षण करण्यासाठी, पेरणीपूर्वी ४-५ तास अगोदर ४ ग्रॅम थिरम किंवा २.०५ ग्रॅम कॅप्टन आणि ७ मिली इमिडा क्लॉप्रिड (कॉन फिडोर) औषध प्रति किलो बियाण्यांना कीटकांपासून संरक्षित करा. सध्या मका पेरणीसाठी शून्य मशागत, रुंद बेड सीडर, बेड प्लांटर, न्यूमॅटिक प्लांटर आणि नॉर्मल प्लांटर उपलब्ध आहेत. माती परीक्षणाच्या आधारे खतांचा वापर केल्यास कमी खर्चात अधिक उत्पादन घेता येते. अधिक उत्पादन मिळविण्यासाठी, शेत तयार करण्यापूर्वी ६० क्विंटल प्रति एकर या प्रमाणात चांगले कुजलेले शेणखत टाका.

# कमी पावसाच्या ठिकाणी अशी करा केळीची लागवड

खरिप हंगाम सुरू होत आहे. केळीची आगाप मृग बहार लागवड अनेक ठिकाणी पूर्ण झाली असली तरी मृग बहार लागवड बाकी आहे. यंदा कमी पावसाची शक्यता वर्तवली जात असल्यामुळे केळी लागवडीचे नियोजन पाण्याच्या उपलब्धतेनुसार करणे अत्यंत गरजेचे आहे. विशेषतः योग्य कंदांची निवड, कंदप्रक्रिया आणि लागवडीपूर्व नियोजन केल्यास केळीचे पीक कमी पाण्यातही चांगले तग धरू शकते. कमी पावसामध्ये केळीची बाग टिकून राहावी यासाठी केळीसाठी वाणाची निवड करताना काही निकष तपासणे उपयोगी ठरु शकते. जसे वाण कमी पाण्यात तग क्षमता, पिकाचा कालवधी, त्याची उंची, रोगप्रतिकारक्षमता, उतिसंवर्धित रोपे की कंद हे निकष तपासावे.

तग धरण्यची क्षमता- वाणांमध्ये कमी पाण्यात तग धरणाऱ्या वाणांची निवड करायची आहे. अनेकदा पाऊस सुरुवातीला येऊन मध्ये खंड पडतो त्यामुळे अशा वातावरणात पावसाचा खंड सहन करणारे वाण निवडणे गरजेचे असते. कालावधी- कमी पावसाची शक्यता असल्यावर पिकाचा कालावधी हा कमी असावा. साधारण वाणांच्या तुलनेत १ महिना आधी केळी परिपक्व होणारा कमी पाण्यात चांगला टिकतो. कारण कमी कालावधीमध्ये येणाऱ्या वाणावर कमी पाण्याचा ताण पडत नाही. उंची- पिकाची उंची ही कमी पाण्यामध्ये अत्यंत महत्त्वाची असते. जास्त उंचीचे पीक जास्त उत्पादन देईल अशी मानसिकता बहुतांश शेतकऱ्यांची असते. परंतु जास्त उंची तर कालावधी आणि पाण्याची गरज हे सूत्र असते. याउलट जर आपण बुटके वाण निवडले तर पिकाला पाण्याची गरजही कमी होते. कमी पाण्यामुळे बऱ्याचदा उंच झाडे मध्यामधून वाकते. याशिवाय पावसाळ्यातील वारा वादळामुळे झाडे कोलमडतात. अशा परिस्थितीमध्ये कमी उंचीची झाडे चांगली टिकतात. रोगप्रतिकारक्षमता- पावसाचा ताण पडल्यास तसेच ढगाळ हवामानात केळीवर करपा म्हणजेच सिगाटोका रोगाचा प्रादुर्भाव होतो. त्यामुळे करपा रोगाला प्रतिकारक्षम असलेले वाण निवडावे. उतिसंवर्धित की कंद- तज्ज्ञांच्या मते, पाण्याची उपलब्धता कमी असल्यावर लागवडीसाठी उतिसंवर्धित रोपांऐवजी कंद निवडावे. कंदामध्ये वातावरणाशी जुळवून घेण्याची चांगली क्षमता असते, त्यामुळे त्याची लागवड खात्रेशीर मानली जाते. कंद निवडताना ३ ते ४ महिन्याचे आणि ४५० ते ७५० ग्रॅम इतक्या वजनाचे हवे. त्याचा आकार हा उभट आणि नारळासारखा असावा. याशिवाय रोपांची निवड करत असाल तर रोपे ही ३० ते ४० सेंमी उंचीची असावीत. त्याला ६ ते ७ पान असावी. तसेच त्याचे हार्डनिंग झालेले असावे. कमी पाण्यासाठी फुले प्राईड या वाणाची शिफारस करण्यात आली आहे. हे वाण कमी उंचीचे असून हा ११ महिन्यात परिपक्व होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हा वाण कमी पाण्यातही तग धरुन उभा राहतो. हा वाण सिगाटोका म्हणजेच करपा रोगासाठी रोगप्रतिकारक असून याच्या एका घडाचं उत्पादन २२ ते २२.५ किलो इतके मिळते. याशिवाय श्रीमंती या स्थानिक वाणाचीही शिफारस तज्ज्ञ करतात.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८८१ : वॉशिंग्टन (डी. सी.) येथे अमेरिकन रेड क्रॉस ची स्थापना झाली.
१८८१ : युरोपीय देशांतील गृहयुद्ध संपल्यानंतर क्लारा बार्टन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मिळून अमेरिकेतील वॉशिंग्टन डी.सी. मध्ये अमेरिकन रेड क्रॉसची स्थापना केली.
१९०४ : पॅरिसमध्ये फेड्रेशन इंटरनॅशनल डी फुटबॉल असोसिएशन (फिफा) ची स्थापना झाली.
१९२७ : चार्ल्स लिंडबर्ग यांनी एकट्याने जगातील पहिले न थांबता अटलांटिक महासागर पार करणारे उड्डाण पूर्ण केले.
१९३२ : अमेलिया इअरहार्ट ह्या अटलांटिक महासागर एकटयाने पार करणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या.
१९७० : अमेरिका राष्ट्राने देशांत आण्विक शास्त्राची चाचणी केली.
१९९१ : पंतप्रधान राजीव गांधी यांची श्रीपेरांबदुर येथे आत्मघातकी पथकाने हत्या केली.
१९९२ : चीनने १,००० किलो टन क्षमतेच्या अणुबॉम्बची यशस्वी चाचणी केली. हा जगातील सर्वात शक्तिशाली अणुस्फोट आहे.
१९९४ : ४३ व्या जागतिक सौंदर्य स्पर्धेत मिस इंडिया सुश्मिता सेनने मिस युनिव्हर्स हा किताब पटकावला. हा किताब मिळवणारी ती पहिलीच भारतीय आहे.
१९९६ : सांगली जिल्ह्यातील माधवराव पाटील हे ब्रिटन मधील इलिंग शहराचे महापौर झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४७१ : आल्ब्रेख्त ड्यूरर, जर्मन चित्रकार.
१५२७ : फिलिप दुसरा, स्पेनचा राजा.
१७९२ : गुस्ताव कोरियोलिस, फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ
१९१४ : जगातील सर्वात जास्त उंचीचे माउंट एव्हरेस्ट शिखर प्रथम चढून जाण्याचा मान मिळवणारे शेर्पा तेनसिंग यांचा नेपाळमधील थामी गावी जन्म..
१९१६ : अमेरिकन कादंबरीकार हेरॉल्ड रॉबिन्स यांचा जन्म. (मृत्यू: १४ ऑक्टोबर १९९७)
१९२१ : आंद्रेई सखारोव्ह, रशियन भौतिकशास्त्रज्ञ.
१९२२ : प्रसिद्ध अमेरिकन आंतरराष्ट्रीय व्यावसायिक कोर्टाचे न्यायाधीश जेम्स लोपेझ वॉटसन यांचा जन्मदिन.
१९२३ : स्विस गणितज्ञ अर्मांड बोरेल यांचा जन्म. (मृत्यू: ११ ऑगस्ट २००३)
१९२८ : कला समीक्षक व लेखक ज्ञानेश्वर नाडकर्णी यांचा जन्म. (मृत्यू: २३ डिसेंबर २०१०)
१९३० : माल्कम फ्रेझर, ऑस्ट्रेलियाचा २२वा पंतप्रधान.
१९३१ : हिन्दी कवी, लेखक व उपहासकार शरद जोशी यांचा जन्म. (मृत्यू: ५ सप्टेंबर १९९१)
१९४४ : मेरी रॉबिन्सन, आयर्लंडची राष्ट्राध्यक्ष.
१९५६ : अभिनेता रविन्द्र मंकणी यांचा जन्म.
१९५८ : भारतीय-अमेरिकन फॅशन डिझायनर नइम खान यांचा जन्म.
१९६० : दक्षिण भारतीय अभिनेता मोहनलाल यांचा जन्म.
१९७१ : प्रख्यात भारतीय चित्रपट निर्माता व पटकथा लेखक आदित्य चोपडा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन


१४७१ : इंग्लंडचा राजा हेन्री (सहावा) यांचे निधन. (जन्म: ६ डिसेंबर १४२१)
१६८६ : वातावरणाबाबत मूलभूत सिद्धांत मांडणारे जर्मन पदार्थवैज्ञानिक ऑटो व्हॉन गॅरिक यांचे निधन. (जन्म: ३० नोव्हेंबर १६०२)
१९२९ : आर्चिबाल्ड प्रिमरोझ, युनायटेड किंग्डमचा पंतप्रधान.
१९७३ : बाळकृष्ण ढवळे, मराठी मुद्रण व प्रकाशन क्षेत्रातील व्यवसायिक.
१९७९ : स्वातंत्र्य वीरांगना जानकीदेवी बजाज यांचे निधन. (जन्म: ७ जानेवारी १८९३)
१९९१ : भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या. (जन्म: २० ऑगस्ट १९४४)
१९९३ : ब्रिटीश सैन्य दलातील हवाई अधिकारी मेजर जनरल जॉन डटन ''जॉनी'' फ्रॉस्ट यांचे निधन.
१९९८ : इंटकचे सोलापुरातील नेते आबासाहेब बाबूराव किल्लेदार यांचे निधन.
२००० : हर्बालाइफ कंपनी चे स्थापक मार्क आर. ह्यूजेस यांचे निधन. (जन्म: १ जानेवारी १९५६)
२००२ : सुलतान अहमद, निर्माते दिग्दर्शक.
२००५ : बंगाल वंशीय सुप्रसिद्ध भारतीय चित्रपट निर्माता व दिग्दर्शक सुबोध मुखर्जी यांचे निधन.

# गाय, म्हैस गाभण राहण्यासाठी घरगुती उपाय

सध्या आपल्याकडे सर्वजण पशुपालन हा व्यवसाय करताना दिसत आहेत. मात्र पशुपालन हा व्यवसाय करत असताना पशुपालकांची सर्वात मोठी समस्या म्हणजे गाई म्हैस गाभण न राहणे ही सर्वात मोठी पशुपालकांची समस्या असते. यामुळे बऱ्याचदा पशुपालन हा व्यवसाय परवडत नसल्याचे देखील पशुपालक बोलतात मात्र आज आम्ही तुम्हाला असे काही उपाय सांगणार आहोत ज्यामुळे तुमची गाई म्हैस १००% गाभण राहील.

गाय, म्हैस गाभण राहण्यासाठी देशी उपाय : जर तुमची गाय म्हैस गाभण राहत नसेल तर तुम्हाला एक घरगुती देशी उपाय करायचा आहे. यासाठी तुम्हाला जास्त खर्च देखील होणार नाही. पहिल्यांदा तुम्हाला बाजारात जाऊन हळकुंड आणावे लागेल यानंतर या हळकुंडाची बुकटी करायचे आहे. साधारणपणे दीडशे ग्रॅम पावडर होईल एवढे हळकुंड बाजारातून आणायचे आहेत. याचा डोस जनावरांना सात दिवस पुरेल एवढा असेल.





पहिल्या टप्प्यातील डोस रोज २० ग्रॅम जनावराला द्यायचा आहे.

हा डोस बनविण्याची पद्धती :यासाठी थोडे गव्हाचे पीठ घ्यावे लागेल ते तुपामध्ये भाजायचे आहे. यामध्ये गूळ किंवा साखर मिक्स करायचे आहे. यानंतर पूर्ण गव्हाच्या पिठाचा हलवा तयार करायचा आहे. आणि हा हलवा तयार झाल्यानंतर त्यामध्ये २० ग्रॅम हळद टाकायची आहे. एका दिवसासाठी आपण २० ग्रॅम हळद बनवलेली आहे. त्यामुळे त्याची काळजी घेणे देखील खूप गरजेचे आहे. त्यानंतर हे मिश्रण जनावरांना खाऊ घालावे.

जनावरांना मिश्रण द्यायची वेळ : प्रत्येक गोष्टीला काही ना काही वेळ असते. आपण आपल्याला गोळ्या खायच्या म्हटल्या तरी आपण त्या वेळेवर खातो. तसेच जनावरांना देखील औषधे द्यायची म्हटली तरी वेळेवर देणे गरजेचे असते त्यामुळे हे तुम्ही बनवलेले मिश्रण जनावरांना त्यांचं खाऊन झाल्यावर देणे गरजेचे आहे. शक्यतो हे मिश्रण संध्याकाळी आठ ते नऊच्या सुमारास देणे गरजेचे आहे.

किती दिवस द्यावे? पहिल्या टप्प्यातील हे मिश्रण जनावरांना सात दिवस देणे गरजेचे असते. सात दिवस दिल्यानंतरच याचा फरक तुम्हाला जाणवेल. जर तुम्ही एक आणि दोन दिवस देऊन हे जर बंद केले तर तुम्हाला यापासून काही फरक जाणवणार नाही त्यामुळे सात दिवसाचा कोर्स कम्प्लीट करणे गरजेचे असते. हे मिश्रण जनावरांना दिल्यानंतर त्यांना कोणत्याही प्रकारचे चारा आणि पाणी द्यायचे नाही. या मिश्रणाने तुमच्या गाय किंवा म्हशीच्या गर्भाशयामध्ये जे काही प्रॉब्लेम असतील ते प्रॉब्लेम दूर होऊन जातील. काही जखमा असतील किंवा इतर काही प्रॉब्लेम असतील सर्व प्रॉब्लेम या मिश्रणामुळे दूर होतील.

गायी म्हशी दुसऱ्यांदा हिट वर आल्यास काय करावे? बऱ्याचदा आपल्या जनावराची एकदा लागवड झाल्यानंतर ते परत रिपीट होते. मात्र त्यासाठी एक वनस्पती फायद्याची ठरत आहे त्या वनस्पतीचे नाव आहे सदाहरी वनस्पती. त्याचबरोबर याला दगडीपाला, कंबरमोडी अशी वेगवेगळी नावे या वनस्पतीचे आहेत.

तुम्हाला ही वनस्पती रानातून घरी नेऊन स्वच्छ पाण्याने धुवायची आहे. या धुतल्यानंतर ज्या जनावरांना याची गरज आहे त्या जनावरांना ५०० ग्रॅम या खाऊ घालायचे आहेत. यामध्ये तुम्ही दोन पद्धतीने त्यांना खाऊ घालू शकता. जर तुम्ही कुटी करत असाल तर त्या कुटीमध्ये हे मिसळून खाऊ घालू शकता किंवा तुम्ही तुमच्या हाताने देखील जनावरांनाही खाऊ घालू शकता असे केल्यास तुमचे जनावर जनावर परत रिपीट होणार नाही.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत





# ८ हजार ५१५ कोटींच्या वार्षिक पत आराखड्याचे जिल्हाधिकारी मित्तल यांच्या हस्ते प्रकाशन

## पीक कर्ज, कृषी व एमएसएमई क्षेत्राला प्राधान्य; वार्षिक पत आराखड्यात बँकांची १०१ टक्के उद्दिष्टपूर्ती

जालना। प्रतिनिधी

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचा ८ हजार ५१५ कोटी रुपयांचा वार्षिक पत आराखडा जिल्हास्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. जिल्हास्तरीय बँकर्स समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री के. के. कनवारिया हे सह-अध्यक्ष म्हणून तर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे एलडीओ निशांत यादव, बँक ऑफ महाराष्ट्रचे उपविभागीय प्रमुख जीवन पाटील, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक योगेश सारणीकर, श्री. कायंदे, उपनिबंधक पी.बी. वर्खेडे, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे जिल्हा व्यवस्थापक शैलेश चौधरी तसेच विविध बँका व शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



यावेळी माहिती देतांना बँक ऑफ महाराष्ट्रचे अग्रणी जिल्हा व्यवस्थापक मंगेश केदार यांनी सांगितले की, मागील वर्षीचा पत आराखडा ७ हजार ७७० कोटी रुपयांचा होता. त्याच्या तुलनेत यंदाच्या आराखड्यात सुमारे १० टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे. या पत आराखड्यात प्राधान्य क्षेत्र कर्जवाटपासाठी ५ हजार ५१५ कोटी रुपयांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून त्यामध्ये पीक कर्जासाठी १ हजार ८२० कोटी रुपये तर कृषी क्षेत्रासाठी एकूण ३ हजार ०५२ कोटी रुपयांचा समावेश आहे. तसेच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रासाठी २ हजार २२० कोटी रुपयांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.बैठकीच्या प्रारंभी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या बँक ऑफ महाराष्ट्र, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखा व्यवस्थापकांचा जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.मागील आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील कामगिरीचा आढावा घेताना, वार्षिक पत आराखड्यांतर्गत बँकांनी ४ हजार ८७० कोटी रुपयांच्या उद्दिष्टाच्या तुलनेत ४ हजार ९०१ कोटी रुपयांचे कर्जवाटप करून १०१ टक्के उद्दिष्टपूर्ती साधल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी चालू आर्थिक वर्षात पीक कर्ज उद्दिष्टपूर्तीकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना बँकांना दिल्या. प्रस्तावित कर्जमाफी योजनेच्या पार्श्वभूमीवर सर्व बँकांनी आवश्यक तयारी ठेवावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच व योजनांतील प्रस्ताव किरकोळ कारणांमुळे नामंजूर न करता अर्जदारांना योग्य मार्गदर्शन करून प्रस्ताव लवकर मंजूर करण्याचे निर्देश त्यांनी दिले.बैठकीदरम्यान योजनेंतर्गत जवळपास ८० टक्के प्रस्ताव नामंजूर होत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. यावेळी एचडीएफसी बँक तसेच इतर बँकांच्या प्रतिनिधींनी जिल्हा उद्योग केंद्राने प्रस्ताव बँकांकडे पाठविण्यापूर्वी त्यांची योग्य छाननी करावी, असे मत व्यक्त केले. त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी खासगी बँका व जिल्हा उद्योग केंद्र यांनी समन्वयाने बैठक घेऊन नामंजुरीचे प्रमाण कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. मत्स्यव्यवसाय व दुग्ध व्यवसायासाठी किसान क्रेडिट कार्ड वितरणाबाबतही बैठकीत सविस्तर चर्चा झाली. मत्स्य विभाग व दुग्ध विकास विभागाने बँकांच्या समन्वयाने विशेष शिबिरे आयोजित करून या क्षेत्रातील लाभार्थ्यांना अधिकाधिक प्रमाणात केसीसीचा लाभ मिळवून द्यावा, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. युनियन बँक ऑफ इंडिया, रामनगर शाखेमधील मत्स्यव्यवसाय केसीसी खात्यांतील थकीत व नूतनीकरण प्रलंबित प्रकरणांचे प्रमाण अधिक असल्याचा मुद्दाही बैठकीत चर्चिला गेला. त्यावर सहाय्यक मत्स्य आयुक्तांनी संबंधित बँकांना केसीसी वसुलीसाठी सहकार्य करावे तसेच प्रलंबित खात्यांच्या नूतनीकरणासाठी समन्वय साधावा, असे निर्देशही जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिले.

## इराण अमेरिका युद्धपरिणाम; ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था लॉकडाऊन ?

### इंधनाअभावी शेती मशागतीच्या आणि दळणवळणाच्या कामांना लागला ब्रेक !


पाथर्डी प्रतिनिधी
प्रा.दादासाहेब खेडकर

अमेरिका आणि इराण या दोन राष्ट्रांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून युद्ध सुरू असून या युद्धाचे विपरीत परिणाम जागतिक स्तरावर अपायकारक ठरत असताना भारतालाही या युद्धाचा फटका बसण्यास सुरुवात झाली आहे इराण देशाकडून इंधनाचा पुरवठा बंद झाल्यामुळे भारतातही इंधनाअभावी राष्ट्रीय वाहतूक आयात निर्यात बंद होण्याच्या मार्गावर आहे महाराष्ट्रावर त्याचे थेट परिणाम होत असताना पाथर्डी तालुक्यात खरीप हंगाम सुरू होण्यापूर्वी मशागतीचे काम शेतकऱ्यांनी सुरू केलेले असताना नांगरठण करणे ढेकळ फोडणे जमीन सपाटीकरण करणे शेणखत किंवा कंपोस्ट खत शेतामध्ये मिसळवणे पाण्याचा निचरा व्यवस्था पेरणीची साधने व बियाणे तयार ठेवणे इत्यादी शेतीची काम शेती अवजारे व ट्रॅक्टर यांच्या साह्याने करण्यासाठी इंधनाची आवश्यकता असताना पाथर्डी तालुक्यात पेट्रोल पंपावर पेट्रोल डिझेल गॅस इंधन स्टॉक संपल्याचे सांगत शेतीच्या कामांना ब्रेक लागल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे इंधनाअभावी शेती मशागतीची कामे मालवाहतूक सार्वजनिक व खाजगी दळणवळण पाणीपुरवठा कारखान्यांमधील उत्पादन ठप्प होऊ लागली आहेत ट्रॅक्टरद्वारे होणारी शेतीची नांगरणी इतर मशागतीची कामे डिझेल अभावी थांबली आहेत शेतीमाल भाजीपाला इतर जीवनावश्यक वस्तू बाजारात नेण्यासाठी लागणारी वाहने इंधनाअभावी जागेवरच थांबली आहे पाथर्डी तालुक्यात भीषण पाणीटंचाई निर्माण झाल्याने पाण्याचे टँकर बंद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे तसेच पर्यटन व प्रवास दैनंदिन प्रवासी बसेस इंधन तूटवड्यामुळे रांगेत तासंतास अडकून आहेत हॉटेल्स व व्यावसायिक स्वयंपाक घर व्यावसायिक एलपीजी सिलेंडर इंधन वेळेवर न मिळाल्यामुळे हॉटेल आणि रेस्टॉरंटचे मेनू कोलमडत असल्याने ग्रामीण भागातील लघु आणि कुटीर उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर आहेत एकूणच ग्रामीण भागातील शेतीवर आधारित असलेली अर्थव्यवस्था इंधनाअभावी लॉक डाऊन होऊ लागली आहे.

### पेट्रोलपंप सील करण्याची तहसीलदारांची तंबी

पाथर्डी तालुक्यात कुठल्याही पेट्रोल पंप चालकाने इंधनाची साठेबाजी केल्याच निदर्शनास आल्यास किंबहुना शेतकऱ्यांना व वाहतूकदारांना इंधन न दिल्यास पाथर्डी तहसील तालुका दंडाधिकारी यांना संपर्क करण्याचे आव्हान तहसीलदार डॉ.उद्धव नाईक यांनी केले इंधनाची साठीबाजी करणाऱ्या पेट्रोल पंप चालकांचा पेट्रोलपंप परवाना रद्द करून पेट्रोलपंप सील करून कायदेशीर कारवाई करण्याची तंबी तहसीलदार डॉ.उद्धव नाईक यांनी दिली आहे.

## || थोडक्यात



### पाथर्डीला वर्षभरात मुबलक व शुद्ध पाणीपुरवठा मिळणार-आव्हाड

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी शहराला येत्या सहा ते सात महिन्यात मुबलक व शुद्ध पाणीपुरवठा करण्यात येईल अशी ग्वाही नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी दिली जायकवाडी धरणातून शासनाच्या नगरउत्थान योजनेतून जलजीवन मिशन अंतर्गत नवीन नळ पाणीपुरवठा योजनेची नगराध्यक्ष अभय आव्हाड व नगरसेवकांनी पाहणी केली त्यावेळी अभय आव्हाड यांनी विश्वास व्यक्त केला यावेळी उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे नगरसेवक नंदकुमार शेळके बंडू बोरुडे सुभाष बोरुडे डॉ.जगदीश मुने संजय देशमुख देवा पवार बाळासाहेब सोनटक्के प्रतीक नांगरे डॉ.शारदा गर्जे वंदना टेके मनीषा उदमले नगरपालिकेचे अधिकारी सचिन राजभोज राहुल काळे हरिभाऊ पवार आदी यावेळी उपस्थित होते जायकवाडी योजनेच्या पाईपलाईन योजना अंतिम टप्प्यात असून ९५% काम पूर्ण झाले आहे मात्र शेवगाव शहरातील एक किलोमीटर लांबीचा भाग तसेच पैठण जवळील बलदावा फार्म हाऊस या ठिकाणी सुमारे दीड किलोमीटरचे काम त्यांच्या फार्म हाऊसमधील असलेल्या पिकांमुळे अपूर्ण राहिले आहे सध्या पाथर्डी शहराला होणारा पाणीपुरवठा जुन्या पाईपलाईनद्वारे पैठणच्या धरणापासून शेवटच्या टोकाला असलेल्या दहिफळ येथुन होत आहे कडक उन्हाळ्यामुळे तेथील पाण्याची पातळी कमी झाली आहे तसेच शेवगाव पाथर्डी व ग्रामीण भागातील ४८ गावाची एकत्रित पाणी योजना असल्यामुळे पाथर्डीला पाणी पुरवण्यास अडथळा निर्माण होत आहे यामुळे पाथर्डीकरांना पाणीटंचाईला तोंड द्यावे लागत आहे मात्र नवीन पाईपलाईन योजना ही पैठण धरणाच्या भिंतीजवळ असल्यामुळे पुढील सहा महिन्यात पाथर्डीकरांचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटणार आहे येत्या सात ते आठ महिन्यांमध्ये पाथर्डीसाठी स्वच्छ व पूर्ण क्षमतेने दोन दिवसाआड पाणी मिळेल असा विश्वास नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी व्यक्त केला.

### रामभाऊ देशमुख यांचे अल्पशा आजाराने निधन

अंबड । प्रतिनिधी



रामभाऊ दत्तात्रय देशमुख वय ७५ वर्षे रा . मोरया रेसिडेंस अंबड यांचे दिनांक २० मे२०२६ रोजी पहाटे अल्पशा आजाराने एका हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असताना निधन झाले आहे. त्यांच्यावर आज २० मे बुधवारी धनगर गल्ली स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी एसबीआय बँकेचे कर्मचारी, वकील, तलाठी ,ग्रामसेवक, पत्रकार, व्यापारी, मित्रपरिवार होता. एसबीआय बँकेचे कॅशियर सुमित देशमुख, घनसावंगी कोर्टातील कलर्क सुहास देशमुख यांचे वडील होते. दोन भाऊ व पत्नी आई असा त्यांचा परिवार आहे. रामभाऊ देशमुख यांनी काही वर्षां टायपिंग ऑपरेटर व्यवसाय केलेला आहे. अतिशय शांत, मनमिळाऊ व एक प्रामाणिक व्यक्तीमत्वाला अंबड शहर मुकले रामभाऊ ऊर्फ श्रीकृष्ण राव म्हणजे नावा प्रमाणेच राम प्रभुचे बहुतांशी गुण अंगी असणारे व कृष्ण रुपातील एक अष्टपैलु माणुस. कारण त्यांनी त्यांच्या खडतर अशा जीवनात टंकलेखनासह रेडीओ दुरूस्ती आदी तांत्रीक कामे देखील केली होती. सुधा काका समवेत त्यांचे रेडिओ रीपेरींगचे एकमेव दुकान त्यावेळी शहरात होते. अंबडच्या श्रीराम संस्थानचे विश्वस्त, तसेच शहराचे जावई हा त्यांचा लौकीक तर आहेच परंतु एक सरळ व सुस्वभाव व अत्यंत समाधानी व्यक्तीमत्व म्हणुन ते शहराची शान होते.

## विधानपरिषदेसाठी दानवे यांच्या उमेदवारीची शिफारस करा; कार्यकर्त्यांची मागणी

जालना। प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर व जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीकडून जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर मुकुंदराव दानवे यांना उमेदवारी देण्यात यावी, अशी मागणी भाजपा जालना महानगरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी लोकनेते माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्याकडे आज दि. २० मे २०२६ रोजी जालना येथे निवेदनाद्वारे केली.यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भास्कर आबा दानवे हे सलग जालना विधानसभा मतदारसंघात पूर्णवेळ संघटन बांधणीचे कार्य केले आहे. त्यांनी मतदारसंघात भाजपा पक्षाच्या शाखा स्थापन करून पक्ष संघटना तळागाळापर्यंत मजबूत करण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. पक्ष संघटनेत विविध जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी जालना नगरपरिषद उपनगराध्यक्ष, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष, १०१-जालना विधानसभा प्रमुख तसेच सध्या जालना महानगर जिल्हाध्यक्ष म्हणून प्रभावी काम केले असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. तसेच स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील आगामी विधानपरिषद निवडणुकीत भारतीय जनता पार्टीकडून भास्कर आबा दानवे यांना उमेदवारी मिळावी यासाठी महाराष्ट्र प्रदेश नेतृत्वाकडे शिफारस करावी, अशी मागणी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केली व ''पक्षासाठी सातत्याने काम करणाऱ्या आणि कार्यकर्त्यांमध्ये मजबूत संपर्क असलेल्या भास्कर आबा दानवे यांना पक्षाने संधी दिलीच पाहिजे,'' अशी भावना देखील यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. यावेळी राजेश राऊत, अशोक पांगारकर, बद्रीनाथ पठाडे, महेश निकम, संतोष लोखंडे, सोपान पेंढारकर, सतीश जाधव, धनराज काबलिये, अमोल धानुरे, सुनील खरे, संजय डोंगरे, संध्या देठे, सिद्धिविनायक मुळे, शशिकांत घुगे, यांच्यासह भाजपा जालना विधानसभेतील विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऑनलाइन औषधविक्री कंपन्यांवर पायबंद घालण्याची केमिस्ट फेडरेशनची मागणी

पाथर्डी । प्रतिनिधी



नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या ऑनलाईन औषधी विक्रीवर शासनाने तत्काळ बंदी घालत बेकायदेशीर पद्धतीने औषधविक्री करणाऱ्या कंपन्यावर पायबंद घालवा अशी मागणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन देत पाथर्डी तालुका केमिस्ट संघटनेच्या वतीने करण्यात आली अनेक ऑनलाईन कंपन्या या मोबाईलच्या एका क्लिकवर नार्कोटिक्स अर्थात नशा येण्यासाठी घेण्यात येणारी औषधे गर्भनिरोधक औषधे झोपेच्या गोळ्या तसेच डॉक्टरांच्या वैद्यकीय सल्याशिवाय विक्री होणाऱ्या अनेक औषधांची विक्री करत ते थेट घरपोच देत असून याद्वारे नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा गंभीर आरोप यावेळी करण्यात आला याबाबतच्या मागणीचे निवेदन तहसीलदार उद्धव नाईक व पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांना देण्यात आले.यावेळी मेडिकल व केमिस्ट पदाधिकाऱ्यांच्या मागण्यानुसार औषधांच्या विक्रीवर सामान्य मेडिकल दुकानांमध्ये कडक नियम आहेत तीच औषधे ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर कुठलीही शहानिशा न करता कमी किमतीत अगदी सहज उपलब्ध होत आहेत ऑनलाईन औषधी विक्री करणाऱ्या या साईट्स अथवा कंपन्या या डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन न तपासता औषध विक्री करत असल्याने युवकांमध्ये व्यसनाधीनता वाढत असून यामध्ये विशेषतः झोपेच्या गोळ्या गर्भलिंग तपासणी करून गर्भपात करणारी औषधे आणि नियंत्रित औषधांचा गैरवापर वाढत असून याद्वारे स्त्री भ्रुण हत्या होत असल्याने शासनाच्या बेटी बचाव या मोहिमेवर व नशेच्या औषधांमुळे तरुण पिढीच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे असे नमूद केले यावेळी केमिस्ट असोसिएशनचे सुहास जरांगे संतोष जिरेसाळ प्रकाश पालवे यांच्यासह अशोक गांधी पंकज मुनोत गणेश बाहेती संदीप लोखंडे जालिंदर सदावर्ते पांडू मंत्री मुन्ना जाजू अरुण आंधळे सय्यद फैयाज राहुल कांबळे अविनाश पालवे धनंजय फुंदे सोमनाथ फासे आदी पदाधिकारी व केमिस्ट बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी; अफवांवर विश्वास ठेवू नका-जिल्हा प्रशासन

जालना। प्रतिनिधी



जिल्ह्यातील काही पेट्रोल पंपांवर पेट्रोलचा साठा तात्पुरता उपलब्ध नसल्याने काही ठिकाणी पंप बंद ठेवण्याची वेळ आली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण होत असून, अनेक वाहनधारक आवश्यकतेपेक्षा जास्त प्रमाणात पेट्रोल व डिझेल भरून घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे. जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंप चालकाने आपल्या पंपावर साठा आहे किंवा नाही अशी माहिती लिहून ठेवणे बंधनकारक आहे नसता सदरील पेट्रोल पंप चालता विरुद्ध कारवाई करण्यात येईल. जिल्ह्यातील विविध पेट्रोल पंपांवर मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे. या परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत जिल्हा प्रशासनाने सर्व संबंधित यंत्रणांना तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच इंधनाचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रशासनाने दिलेल्या निर्देशांनुसार संबंधित तेल कंपन्या आणि पेट्रोल पंप चालकांशी समन्वय साधून पेट्रोल व डिझेलचा पुरवठा नियमित ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी होऊ नये यासाठी आवश्यकतेनुसार पोलीस प्रशासनाच्या मदतीने नियोजन करण्यात येणार आहे. यासोबतच स्थानिक वृत्तपत्रे, सोशल मिडिया आणि इतर माध्यमांद्वारे अधिकृत व सत्य माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात येत आहे. कोणत्याही प्रकारची अफवा, चुकीची माहिती किंवा घबराट निर्माण करणारे संदेश पसरवू नयेत, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जिल्ह्यातील सर्व पेट्रोल आणि डिझेल पंपांवर तात्काळ तपासणी मोहीम राबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या मोहिमेद्वारे इंधन साठा, विक्री आणि वितरणाची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. कोणत्याही पेट्रोल पंप चालकाकडून जाणीवपूर्वक साठेबाजी, कृत्रिम टंचाई निर्माण करणे, जादा दराने विक्री करणे अथवा नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होईल असे प्रकार आढळल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार आहे. अशा प्रकरणांमध्ये जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ तसेच इतर लागू कायद्यान्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच सर्व संबंधित अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील परिस्थितीवर वैयक्तिक लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय, दररोज बंद आणि सुरू असलेल्या पेट्रोल पंपांचा अहवाल, उपलब्ध इंधन साठ्याची माहिती आणि करण्यात आलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल प्रशासनाकडे सादर करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. प्रशासनाने नागरिकांना शांतता राखण्याचे आणि आवश्यकतेपुरतेच इंधन खरेदी करण्याचे आवाहन केले असून, जिल्ह्यात इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी सुकेशिनी पगारे यांनी सांगितले आहे.

# अपंग शाळेच्या शिक्षकांचे आपापले व्यवसाय जोरात

## अपंग शाळा वाऱ्यावर तरीही समाज कल्याण विभागातून होतात पगार

**बीड । प्रतिनिधी**

बीड समाज कल्याण विभागाला चावडीचे स्वरूप आले असून बीड जिल्ह्यातील अनेक शाळेतील शिक्षक आपापले व्यवसाय जोमाने करत आहेत. शाळेत हजर नसतानाही मात्र त्यांचे लाखोंचे पगार समाज कल्याण विभागातून बिन बोभाट काढले जात आहेत. तुम्ही शाळा चालवा नाहीतर सोडून द्या मात्र आमचे काय ते बघा अशा धरतीवर समाज कल्याण विभाग काम करत असून शाळेत हजर नसतानाही आणि संस्थाचालकांच्या तक्रारी असतांनाही समाज कल्याण विभागातून बिन बोभाट पगार निघतो. अनेक संस्था चालकांनी या संदर्भात तक्रारी केलेल्या आहेत. मात्र या तक्रारीला केराची टोपली दाखवत समाज कल्याण विभागातील अधिकारी सर्वांचे पगार बिन बोभाट काढतात. शाळेत काय चालले आहे? विद्यार्थी आहेत की नाहीत? शाळा भरते की नाही? याचे समाज कल्याण विभागाला काही देणे घेणे नाही. आता जिल्हाधिकाऱ्यांनीच समाज कल्याण विभागातील अधिकाऱ्यांची चौकशी करावी अशी मागणी होत आहे.

बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात अपंग शाळा आहेत. पूर्वीच्या काळी ऑफलाईन हजेरी पत्रक असल्याने अनेक शाळांच्या विद्यार्थ्यांची दोन-दोन ठिकाणी नावे असायची. अनेक जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची नावे अपंग शाळांच्या पटावर असायची. हे अनेक वर्ष चालले. मात्र आता यु-डायस पद्धत सुरू झाल्याने सर्वांचीच अडचण झाली आहे. ज्या ठिकाणी विद्यार्थी आहेत. त्या ठिकाणी शिक्षक व्यवस्थित काम करत नाहीत आणि ज्या ठिकाणी शिक्षक चांगले आहेत त्या ठिकाणी विद्यार्थीच नाहीत. अशी परिस्थिती आहे. अनेक अपंग शाळांना इमारती नसल्याचे सांगितले जात आहे. अपंग विद्यार्थ्यांना सोयी सुविधा देण्यासाठी समाज कल्याण विभागाने नियम घालून दिलेले आहेत. मात्र या नियमाचे काही मोजके संस्थाचालकच पालन करतात. ज्या ठिकाणी संस्थाचालक चांगले आहेत त्या ठिकाणी शिक्षक नखरे करतात. अनेक शाळांमध्ये आता सध्या विद्यार्थी संख्या घटत चालली असून अनेक शिक्षक आपापले व्यवसाय जोमाने करत आहेत. मात्र समाज कल्याण विभागाच्या आशीर्वादाने त्यांचे पगार नियमित होताना दिसत आहेत. समाज कल्याण विभागातील अधिकारी वर्षानुवर्ष शाळांकडे फिरकतच नाहीत. फक्त कागदोपत्री तपासण्या होतात अशा स्थितीत समाज कल्याण विभागाकडून शिक्षकांना करोडो रुपयांचे पगार दिले जात आहेत. मात्र त्याचा उपयोग कितपत होतो याची तपासणी कोणी करत नाही. समाज कल्याण विभागात बसलेले अधिकारीही आपली तुंबडी भरण्यासाठी बाकी गोष्टींकडे दुर्लक्ष करतात. अपंग शाळांच्या संस्थाचालकांनी तक्रार केली तर या तक्रारीची दखलही घेतली जात नाही. अनेक शिक्षकांच्या बाबतीत ते शाळेवर येत नाहीत अशा तक्रारी आहेत. त्यांचे ठिकठिकाणी व्यवसाय सुरू आहेत. त्याच्या पुराव्यासह तक्रारी केलेल्या आहेत. तरीही समाज कल्याण अधिकारी त्याची दखल घेत नाहीत. शिक्षकांकडून मिळणारा लाभ मोठा असल्याने संस्थाचालकांची दखल घ्यायची गरज त्यांना वाटत नसावी अशीच परिस्थिती सध्या आहे. अपंग विद्यार्थ्यांना याचा काही फायदा होत नाही तरीही करोडो रुपये शासनाचे यावर खर्च होत आहेत. याला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर जिल्हाधिकारी काय कारवाई करणार? असा प्रश्न आहे. समाज कल्याण विभागावर जिल्हा परिषदेचे वर्चस्व असते. जिल्हा परिषदेचे प्रमुख म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी ही यावर कारवाई करू शकतात. मात्र ही बाब जोपर्यंत त्याच्या निदर्शनास येत नाही तोपर्यंत याबाबतीत ते अनभिज्ञ असतात .बीड जिल्हा परिषदेला कर्तव्यदक्ष मिळालेले आहेत. मात्र त्यांना याबाबत सविस्तर माहिती मिळाली तर ते यावर कारवाई करू शकतात. मात्र शिक्षण विभाग आणि समाज कल्याण विभागाकडून त्यांच्यापर्यंत माहिती पोहोचणार नाही याची दक्षता घेतली जात आहे. काही विचारले तर चुकीची माहिती मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यापर्यंत पोहोचवली जाते .गेल्या अनेक दिवसांपासून समाज कल्याण विभागाला समाज कल्याण अधिकारी नाही. त्यामुळे खालच्या अधिकाऱ्यांची मनमानी चालू आहे. या ठिकाणी नखाते नावाचे अधिकारी कारभार पाहतात. त्यांचीच आता चौकशी करणे गरजेचे आहे. आतापर्यंत किती शिक्षकांना नोकरी न करता पगार दिला याची चौकशी होणे गरजेचे आहे. याची सखोल चौकशी झाली तर अनेक जण यात अडचणीत येणार आहेत.

# भाजी मंडईत अतिक्रमण हटाव मोहीम

## रस्त्यावर बसणाऱ्या भाजी विक्रेता,फळगाड्यावर कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरातील मुख्य भाजी मंडई परिसरात रस्त्यावरच भाजीपाला व फळ विक्रेते बसत असल्याने नागरिकांना तसेच वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. रस्त्यावर वाढलेल्या अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली होती. त्यामुळे बीड नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी भाजी मंडई परिसरात अतिक्रमण हटाव मोहीम राबवत फळगाडे व भाजीपाला विक्रे त्यांवर कारवाई केली.**

नगरपालिकेच्या पथकाने रस्त्यावर उभ्या करण्यात आलेल्या फळगाड्या व भाजी विक्रीसाठी लावण्यात आलेले तात्पुरते अतिक्रमण हटवले. या कारवाईत भाजी मंडी रस्त्यावर बसणाऱ्यांचा भाजीपाला, वजन काटे छत्री सह साहित्य टेम्पोत भरण्यात आला या कारवाईमुळे भाजी मंडई परिसरातील वाहतुकीला काही प्रमाणात दिलासा मिळाला असून नागरिकांनीही समाधान व्यक्त केले.

यापूर्वी बीड शहरातील जालना रोड, अंबिका चौक, नगर रोड, शाहूनगर तसेच बार्शी रोड परिसरातील अतिक्रमणांवर नगरपालिका व पोलिस प्रशासनाने संयुक्त कारवाई करत अनेक अतिक्रमणे हटवली होती. त्यानंतर आता शहराच्या मुख्य भागातील भाजी मंडई परिसरात कारवाई झाल्याने रस्त्याने मोकळा श्वास घेतल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे. दरम्यान, अतिक्रमण हटाव मोहीम सातत्याने सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले असून, रस्त्यावर अतिक्रमण करून फळगाडे, भाजीपाला, हॉटेल टपऱ्या अथवा अन्य व्यवसाय उभा करू नयेत, अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# दिव्यांगांच्या अडचणी सोडवा; खा.सोनवणे यांचे सीएसला पत्र, तातडीने कारवाईचे निर्देश

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांना शासकीय योजनांचा लाभ घेताना मोठ्या प्रमाणावर अडचणी येत असून, विशेषत: वऊकऊ कार्डला आधार क्रमांक लिंक नसण्यामुळे अनेक लाभार्थी योजनांपासून वंचित राहत आहेत. या गंभीर समस्येची दखल घेत बीड लोकसभेचे खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हा प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. या संदर्भात



त्यांनी बीडचे जिल्हा शल्य चिकित्सक यांना अधिकृत पत्र पाठवून तातडीने आणि ठोस पावले उचलण्याचे कडक निर्देश दिले आहेत.

दिव्यांग बांधवांचे प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी न लागल्यास ही बाब प्रशासकीय स्तरावर खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही या पत्राद्वारे देण्यात आला आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हा रुग्णालयाच्या कारभारावर आणि दिव्यांग योजनांच्या संथ गतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. बीड जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळणे त्यांचे हक्क आहे. मात्र, केवळ युडीआयडी कार्ड आणि आधार लिंकिंग न झाल्यामुळे शेकडो दिव्यांग लाभार्थ्यांचे प्रस्ताव धूळ खात पडले आहेत. परिणामी, समाजकल्याण आणि इतर शासकीय योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचत नाहीये. ही बाब अत्यंत गंभीर असून प्रशासन स्तरावर तातडीने पावले उचलणे गरजेचे आहे, असे खासदार सोनवणे पान ३ वर

# पीक विमा आणि पोखरा योजना त्रुटी बाबत कृषी मंत्री यांच्या दालनात बैठक - आ.सोंळके

माजलगाव । प्रतिनिधी

मागील काही दिवसांपूर्वी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प २.० (पोखरा) योजनेतील त्रुटी दूर करून निकषांमध्ये सुधारणा करण्यात यावी,यासाठी कृषी मंत्री यांच्याकडे विनंती केली होती. त्या अनुषंगाने दि १९ मे मंगळवार रोजी मंत्रालयात बैठक संपन्न झाली.



तसेच, खरीप हंगाम ३०२५ करिता हेक्टरी १७,५०० पीक विमा नुकसान भरपाई देण्यात यावी,अशी आग्रही मागणी कृषी मंत्री ना दत्ता मामा भरणे यांच्याकडे करण्यात आली. खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना हा विमा मिळणे अत्यावश्यक असून त्यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे.विमा प्रश्न निश्चितच सकारात्मक निर्णय होईल हा विश्वास आ.प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केला आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने पाठपुरावा करून त्यांच्या न्याय्य मागण्या शासनापर्यंत पोहोचविण्याचे काम पुढेही सुरूच राहील असा ठाम विश्वास ही आ.प्रकाश सोळंके यांनी यावेळी व्यक्त केला आहे.

# माजलगावात भरदिवसा घरफोडी; सोन्याचे दागिन्यासह रोख रक्कम लंपास

माजलगाव । प्रतिनिधी

अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ६५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना माजलगाव शहरानजीक नवीन वसाहत भाटवडगाव परिसरात दि १८ मे सोमवार रोजी उघडकीस आली असून अज्ञात चोरट्यांविरोधात माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार रत्नेश्वर अर्जुराव सोळंके (व्यवसाय ड्रायव्हर,रा.नवीन वसाहत भाटवडगाव,ता. माजलगाव) यांच्या घरी दि.१८ मे सोमवार रोजी सकाळी ११:०० ते सायंकाळी ६:०० वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी घराचा दरवाजा उघडून प्रवेश केला. त्यानंतर कपाटात ठेवलेले सुमारे ८ ग्रॅम वजनाचे दोन सोन्याचे झुंबर तसेच ४५ हजार रुपयांची रोख रक्कम चोरी करून नेली.चोरी गेलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत ६५ हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणी दि.१९ मे रोजी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुरनं. १५९/२०२६ अंतर्गत कलम ३३१(४), ३०५ (ए) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास माजलगाव शहर पोलीस करत आहेत.

# पाटोदा वाघीरा फाट्यावर इनोव्हाची दुचाकीला धडक; नुकताच सैन्यदलात भरती झालेला तरुण ठार

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा - मांजरसंबा महामार्गावरील वाघीरा फाटा येथे एक भीषण अपघात झाला आहे. एका भरधाव इनोव्हा कारने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत, नुकताच भारतीय सैन्यदलात भरती झालेल्या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. संदिपान बांगर (रा. वाघीरा) असे या अपघातात प्राण गमावलेल्या दुर्दैवी जवानाचे नाव आहे.मिळालेल्या माहितीनुसार, वाघीरा गावचा रहिवासी असलेला संदिपान बांगर हा कष्टाच्या



जोरावर नुकताच भारतीय सैन्यदलात दाखल झाला होता. घरची गरिबी हटवून आई-वडिलांचे नाव मोठे करावे आणि छातीवर देशाचा गणवेश मिरवावा, असे स्वप्न त्याने उराशी बाळगले होते. त्याच्या या यशामुळे संपूर्ण कुटुंबाला त्याचा सार्थ अभिमान होता.मात्र, महामार्गावरील पान ३ वर

# गोदावरी नदी पात्रात पाणी सोडण्याच्या मागणीसाठी शिवसेनेचे रास्ता रोको आंदोलन

गेवराई । प्रतिनिधी

मराठवाड्यात निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर गोदावरी नदी पात्रात तात्काळ पाणी सोडण्यात यावे यासाठी या प्रमुख मागणीसाठी शिवसेनेच्या वतीने राक्षसभुवन फाटा, तालुका गेवराई येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड. चंद्रकांत आप्पा नवले यांनी केले. तर या आंदोलनाचे प्रमुख आयोजक तगछढ तालुकाप्रमुख बाळासाहेब खेडकर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन यशस्वी झाले, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे साहेब यांनी या आंदोलनाची दखल घेतली होती,

यावेळी आंदोलनात बोलताना ॲड. नवले यांनी सांगितले की, शेतकऱ्यांची खरीप हंगामाची तयारी सुरू असून विहिरी, बोअरवेल आणि नदीपात्र पूर्णपणे कोरडे पडले आहे. जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून शासनाने तातडीने गोदावरी नदी पात्रात पाणी सोडण्याचा निर्णय घ्यावा, अन्यथा शिवसेना आणखी तीव्र आंदोलन छेडेल असता गोदावरी नदीच्या पात्रात पाणी सोडण्याचा धाडसी निर्णय मंजुर झाला

आंदोलनाचे आयोजक बाळासाहेब खेडकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, गोदावरी नदी पात्र कोरडे पडल्यामुळे शेतकरी, शेतमजूर व सर्वसामान्य नागरिकांचे मोठे हाल होत आहेत. अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असून जनावरांनाही पाणी मिळणे कठीण झाले होते शासनाने तात्काळ दखल घेऊन नदी पात्रात पाणी सोडण्याचा निर्णय पुर्ण झाला शिवसेना जनआंदोलनाला यश आले, या आंदोलनाला जइउ जिल्हाप्रमुख संजय बाबा लकडे, तालुकाप्रमुख उद्धव मडके, तगछढ तालुकाप्रमुख बाळासाहेब खेडकर, जिल्हा संघटक विक्रमराजे भोसले, शहरप्रमुख मुकेश महाजन, युवा सेना शहर प्रमुख गणेशराव पवार तालुका उपाध्यक्ष परसराम मासाळ, शेतकरी नेते राजेंद्र डाके, गेवराई संपर्कप्रमुख राजाभाऊ तलावडे यांच्यासह पान ३ वर

# ऑनलाईन औषध विक्री बंद करण्यासह विविध मागण्यांसाठी देशव्यापी बंदला आष्टी तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

आष्टी । प्रतिनिधी

ऑनलाईन औषध विक्री तात्काळ बंद करावी, औषध व्यवसायाशी संबंधित विविध प्रलंबित मागण्या मार्गी लावाव्यात, तसेच स्थानिक औषध विक्रेत्यांचे हित जपावे या प्रमुख मागण्यांसाठी देशभरातील मेडिकल व्यावसायिकांनी पुकारलेल्या देशव्यापी बंदला आष्टी तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आष्टी तालुका मेडिकल असोसिएशनच्या नेतृत्वाखाली शहर व तालुक्यातील बहुतांश



मेडिकल दुकाने दिवसभर बंद ठेवण्यात आली. आष्टी शहरात सुमारे ६० किरकोळ मेडिकल दुकाने आणि १० होलसेल औषध विक्रेते असून, संपूर्ण तालुक्यात २६० हून अधिक मेडिकल स्टोअर्स कार्यरत असल्याची माहिती आष्टी तालुका मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष संजय शिंगवी यांनी दिली. देशव्यापी आंदोलनाला पाठिंबा देत सर्व सदस्यांनी आपली दुकाने बंद ठेवली. मात्र नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी अत्यावश्यक आणि आपत्कालीन परिस्थितीत लागणारी औषधे गरजूंना उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे आंदोलनास पाठिंबा देतानाच सामाजिक जबाबदारीचे भानही औषध विक्रेत्यांनी जपले.

या बंदमुळे ऑनलाईन औषध विक्री अधिक डिस्काउंट या मुळे स्थानिक मेडिकल व्यवसायावर होत असलेल्या परिणामांविषयी आणि औषध व्यवसायातील विविध पान ३ वर

# धाराशिव-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून जयदत्त धस यांना भाजपची उमेदवारी द्यावी -ॲड. प्रकाश कवठेकर

बीड । प्रतिनिधी

धाराशिव-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने युवा नेतृत्वाला संधी देत युवा नेते जयदत्त भय्या धस यांना उमेदवारी द्यावी, अशी जोरदार मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य ड. प्रकाशदादा कवठेकर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात जयदत्त भय्या धस यांच्या उमेदवारीमुळे भाजपला मोठा राजकीय फायदा होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

ड. कवठेकर म्हणाले की, धाराशिव-लातूर-बीड हा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ राजकीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या मतदारसंघामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्यांचे मोठे जाळे असून ग्रामीण भागातील राजकारणावर या निवडणुकीचा मोठा प्रभाव पडत असतो. अशा परिस्थितीत जनसंपर्क, संघटन क्षमता आणि कार्यकर्त्यांशी असलेली नाळ मजबूत असलेला उमेदवार भाजपने मैदानात उतरविणे आवश्यक आहे.



यापूर्वी या मतदारसंघातून लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांनी प्रभावी नेतृत्व करत विजय संपादन केला होता. त्यांच्या नेतृत्वाखाली आष्टी, पाटोदा, शिरूर परिसरात भाजपची संघटनात्मक ताकद मोठ्या प्रमाणावर वाढली. नगरपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषद आणि विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्यांनी कार्यकर्त्यांचे मजबूत जाळे निर्माण केले आहे. बीड जिल्ह्यासह धाराशिव आणि लातूर जिल्ह्यांमध्येही त्यांचा मोठा जनसंपर्क असून सामान्य नागरिकांमध्ये त्यांच्याविषयी विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ॲड. कवठेकर पुढे म्हणाले की, आमदार सुरेश आण्णा धस यांनी सातत्याने विकासकामांना प्राधान्य देत ग्रामीण भागातील अनेक प्रश्न सोडविण्यासाठी मोठा पाठपुरावा केला आहे. पाणीपुरवठा, रस्ते, शिक्षण, सहकार आणि युवकांच्या रोजगाराच्या प्रश्नांवर त्यांनी प्रभावी भूमिका बजावली आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे भाजपला ग्रामीण भागामध्ये मोठी ताकद मिळाली आहे. त्याच परंपरेत युवा नेते जयदत्त भय्या धस हे सक्रियपणे कार्य करत असून युवकांमध्ये त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. जयदत्त भय्या धस यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि युवकांच्या विविध प्रश्नांवर पान ३ वर

# पुरुषोत्तमपुरीमध्ये प्रशासनाच्या अधिकाऱ्यांचा यात्रा नियोजन अभाव; १३ वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथे यात्रेनिमित्त मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी झाली असताना प्रशासनाच्या योग्य नियोजनाअभावी दुर्दैवी घटना घडल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. यात्रेदरम्यान गंगेत बुडून १३ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, माजलगाव येथील आकाश लक्ष्मण म्हेत्रे (पाटील गल्ली माजलगाव) हा मुलगा आपल्या कुटुंबासह यात्रेनिमित्त पुरुषोत्तमपुरी येथे आला होता. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी तो चिवडा व पेढे विक्रीचे काम करत होता. यात्रेच्या गर्दीत गंगेत आंघोळ करण्यासाठी गेल्यानंतर तो पाण्याच्या खोल भागात गेल्याचे सांगण्यात येत आहे. त्यात त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. पुरुषोत्तम पुरी येथील गोदावरी पात्रात तो बुडाल्यानंतर गंभीर अवस्थेत त्याला बाहेर काढण्यात आले होते नंतर माजलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात त्याला उपचारार्थ दाखल करण्यात आले होते नंतर त्याला मृत घोषित करण्यात आले.

या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी प्रशासनावर नाराजी व्यक्त केली आहे. यात्रेदरम्यान मोठ्या प्रमाणात भाविक येत असतानाही सुरक्षेच्या पुरेशा उपाययोजना करण्यात आल्या नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. नदी परिसरात सुरक्षारक्षक, बचाव पथक तसेच सूचना फलकांची कमतरता असल्याचेही सांगण्यात येत आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून मृत मुलाच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. प्रशासनाने भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी यात्रांचे योग्य नियोजन करून सुरक्षा उपाययोजना वाढवाव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
गुरूवार दि.२१ मे २०२६ । पान ७

# पुण्यात कचऱ्याचे संकट गडद; बंद प्रकल्प सुरू करण्याचे आदेश, दररोज ३७० टन अतिरिक्त प्रक्रिया

पुणे: शहरातील काही कचराप्रक्रिया प्रकल्प बंद पडले असून, काही प्रकल्प पूर्णक्षमतेने कार्यरत नसल्याने शहरात कचरा साचण्याची समस्या निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेने तातडीने उपाययोजना हाती घेत प्रतिदिन अतिरिक्त ३७० टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे निर्देश प्रशासन आणि संबंधित ठेकेदारांना दिले आहेत. तसेच, झाडणकामाच्या गुणवत्तेबाबत येणाऱ्या तक्रारींसाठी संबंधित ठेकेदारांनाच जबाबदार धरण्यात येणार असल्याचे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी मंगळवारी स्पष्ट केले.

महापालिकेच्या सोमवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत विविध पक्षांच्या नगरसेवकांनी शहरातील वाढत्या कचरा समस्येबाबत प्रशासनाकडे खुलाशाची मागणी केली होती. मात्र, खुलासा होण्यापूर्वीच आचारसंहिता लागू झाल्याने सभा तहकूब करण्यात आली. त्यानंतर आयुक्त राम यांनी मंगळवारी सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या सहायक आयुक्तांसह घनकचरा विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची आढावा बैठक घेतली. बैठकीला अतिरिक्त आयुक्त प्राजित नायर, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संतोष वारुळे, प्रसाद काटकर आदी उपस्थित होते.



या बैठकीत केशवनगर येथील प्रत्येकी सुमारे १७५ टन क्षमतेचे दोन प्रकल्प बंद असल्याची माहिती समोर आली. तसेच, सूस येथील नोबल कंपनीचा प्रकल्प आणि रामटेकडी येथील पूना बायो एनर्जी प्रकल्पही कमी क्षमतेने सुरू असल्याने शहरात दररोज सुमारे ३०० ते ३५० टन कचऱ्याचा अतिरिक्त ताण निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर संबंधित प्रकल्पांतील अडचणींचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

प्रत्येक प्रकल्पात सध्याच्या क्षमतेपेक्षा अधिक प्रमाणात कचऱ्यावर प्रक्रिया करण्याच्या सूचना संबंधित ठेकेदारांना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे दररोज अतिरिक्त ३७० टन कचऱ्यावर प्रक्रिया होणार असून, सध्याची समस्या कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. तसेच बंद असलेले प्रकल्प तातडीने सुरू करून पूर्ण क्षमतेने चालविण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

दरम्यान, कचरा वाहतुकीसाठी उपलब्ध वाहनांची संख्या अपुरी असल्याचेही बैठकीत समोर आले. त्यामुळे मोटारवाहन विभागाची जबाबदारी घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे वर्ग करण्याबाबत प्रशासन विचार करीत असल्याची माहिती आयुक्त राम यांनी दिली. तसेच चिकन व मटण दुकानांमधून निर्माण होणारा कचरा स्वतंत्रपणे संकलित करून त्याची विल्हेवाट लावण्यासाठी विशेष योजना राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.क्षेत्रीय कार्यालयांचे सहायक आयुक्त तसेच मुकादम यांनी दररोज सकाळी साडेसात ते साडेनऊ या वेळेत कार्यालयात उपस्थित राहून झाडणकाम व इतर स्वच्छता कामांवर देखरेख ठेवावी, तसेच त्याचा अहवाल दर पंधरा दिवसांनी आयुक्त कार्यालयाकडे सादर करावा, असे निर्देशही देण्यात आले आहेत. शहरातील अनेक भागांमध्ये झाडणकामाचे कंत्राट खासगी ठेकेदारांकडे देण्यात आले आहे. मात्र, कंत्राटी कर्मचाऱ्यांवर योग्य नियंत्रण नसल्याने स्वच्छतेबाबत तक्रारी वाढत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणांच्या झाडणकामाच्या देखरेखीची जबाबदारी थेट संबंधित ठेकेदारांवर निश्चित करण्यात आली असून, तक्रारी आल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे.

# भीषण अपघात.! कारमध्ये लोखंडी रेलिंग घुसलं; दोन जणांचा दुर्दैवी अंत

पुणे । प्रतिनिधी

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर पुन्हा एकदा भीषण अपघाताची घटना घडली असून या दुर्घटनेत दोघांचा जागीच मृत्यू झाला आहे, तर एक जण गंभीर जखमी





झाला आहे. भरधाव वेगातील कार चालकाचे नियंत्रण सुटल्याने थेट लोखंडी सुरक्षा रेलिंगमध्ये घुसली. या भीषण धडकेनंतर कारचा अक्षरशः चुराडा झाला असून अपघातामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या मार्गिकेवर बऊर गावाजवळ हा अपघात झाला. भरधाव वेगातील कार अचानक नियंत्रणाबाहेर गेली आणि एक्स्प्रेस वेवरील लोखंडी सुरक्षा रेलिंगला जोरदार धडकली. धडकेची तीव्रता इतकी भीषण होती की कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अपघातानंतर कारमधील प्रवासी आतमध्येच अडकून पडले होते. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, आयआरबीची बचाव पथके आणि वाहतूक विभागाचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. बचावकार्य करताना कारचा पत्रा कापून तिघांना बाहेर काढण्यात आले.मात्र त्यापैकी दोघांचा जागीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. गंभीर जखमी झालेल्या एका व्यक्तीला तात्काळ जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले जात आहे.

मृत व्यक्तींची ओळख पटवण्याचे काम पोलिसांकडून सुरू असून त्यांच्या नातेवाईकांशी संपर्क साधण्याचे प्रयत्नही सुरू आहेत. दोघांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. अपघात नेमका कशामुळे झाला? चालकाला झोप लागली होती का? अतिवेग कारणीभूत ठरला का? किंवा वाहनात तांत्रिक बिघाड होता का? याचा तपास महामार्ग पोलीस करत आहेत. दरम्यान, या अपघातामुळे मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर काही काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. अपघातग्रस्त वाहन बाजूला हटवून वाहतूक सुरळीत करण्याचे काम युद्धपातळीवर करण्यात आले. पोलिसांनी वाहनचालकांना सावधगिरीने वाहन चालवण्याचे आवाहन केले असून पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर एक्स्प्रेस वेवर वेगमर्यादेचे पालन करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

# अभिनेत्री शिल्पा शेट्टीच्या क्लबमध्ये तरूण-तरूणींचे अश्लील चाळे; गर्दीने भरलेल्या ठिकाणी नको ते कृत्य, व्हिडीओ व्हायरल,

पुणे : पुण्यातील मुंढवा परिसरातील अभिनेत्री शिल्पा शेट्टीच्या 'बॅस्टियन' क्लब पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. क्लबमध्ये तरुण-तरुणींकडून अश्लील चाळे सुरू असल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला असून, त्यामुळे पुण्यातील पब संस्कृती पुन्हा चर्चेत आली आहे.



व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये शेकडो लोकांच्या गर्दीत काही तरुण आणि तरूणी अश्लील कृत्य करताना दिसत आहेत. मोठ्या आवाजातील संगीत, मद्यधुंद वातावरण आणि सार्वजनिक ठिकाणी सुरू असलेल्या या प्रकारामुळे आणि व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमुळे नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे हा प्रकार सुरू असताना क्लबमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी असल्याचेही व्हिडिओमध्ये दिसून येत आहे. मुंढवा परिसरातील या उच्चभ्रू क्लबमध्ये यापूर्वीही विविध कारणांमुळे वाद निर्माण झाले होते. आता पुन्हा एकदा व्हायरल व्हिडिओमुळे पुण्यातील पब आणि नाईटलाइफ संस्कृतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. सोशल मीडियावर या घटनेविरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, अशा प्रकारांवर पोलिस आणि प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.अभिनेत्री शिल्पा शेट्टीच्या 'बॅस्टियन' क्लबमध्ये तरूण तरूणी एकीकडे गाण्यावर नाचत असतानाच मागच्या बाजूला बसलेले काही तरूण तरूणी सर्वांसमोर अश्लील वर्तन करताना दिसत आहेत, आजुबाजूला असलेल्या गर्दीत देखील ते सोफ्यावरती बसून अश्लील कृत्य करताना दिसत आहे, यामुळे पालकांनी संताप व्यक्त केला आहे. तर तरूणांचा हा अश्लील चाळे करताना व्हिडिओ व्हायरल झाला आहे. पुण्यातील मुंढवा परिसरात बॅस्टियन नावाचं शिल्पा शेट्टीच्या क्लबमध्ये हा प्रकार समोर आला आहे. शेकडो लोकांच्या गर्दीत सुरू असलेला हा अश्लील प्रकार व्हिडिओमध्ये कैद झाला आहे.

# शिवराज मोटेगावकरच्या आरसीसी क्लासेसवर पुणे महापालिकेची मोठी कारवाई; जीएम रोडवरील कॅम्पस सील

पुणे । प्रतिनिधी

नीट पेपरफुटी प्रकरणात अटक झाल्यानंतर आता शिवराज मोटेगावकर यांच्या अडचणी आणखी वाढताना दिसत आहेत. केंद्रीय अन्वेषण विभागाच्या कारवाईनंतर आता पुणे महानगरपालिकेनेही मोटेगावकर यांच्या मालमत्तांवर धडक कारवाई सुरू केली आहे. पुण्यातील प्रसिद्ध आरसीसी क्लासेसशी संबंधित मालमत्ता सील करण्यात आली असून, अनधिकृत बांधकामावरही पालिका कारवाई करणार आहे. पुण्यातील जे. एम. रोडवरील बोरावके बिल्डिंगमध्ये असलेल्या आरसीसी क्लासेसच्या कॅम्पसवर बुधवारी सकाळपासूनच महापालिकेचं पथक दाखल झालं. या ठिकाणी वैद्यकीय आणि अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांसाठी नीट आणि जेईई चे क्लासेस घेतले जात होते. मात्र, थकीत मालमत्ता कर आणि



नियमबाह्य व्यावसायिक वापराच्या आरोपांमुळे पालिकेने संबंधित जागा सील केली.

महापालिकेच्या प्राथमिक तपासात या मालमत्तेवर तब्बल ३.२० कोटी रुपयांचा मालमत्ता कर थकीत असल्याचं समोर आलं आहे. वारंवार नोटिसा देऊनही कर न भरल्यामुळे अखेर प्रशासनाने कठोर पाऊल उचलल्याचं सांगितलं जात आहे. ही कारवाई केवळ कर थकबाकीपुरती मर्यादित राहिलेली नाही. पालिकेच्या अधिकाऱ्यांच्या मते, इमारतीच्या मूळ आराखड्यात परवानगीशिवाय बदल करण्यात आले होते. पार्किंगच्या जागांमध्ये फेरफार, अतिरिक्त बांधकाम आणि नियमबाह्य बदल आढळून आल्याने बांधकाम विभागाने पोलिस बंदोबस्तात अनधिकृत भागांवर कारवाई सुरू केली. घटनास्थळी बुलडोझर दाखल करण्यात आला असून, नियमबाह्य बांधकाम हटवण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून सांगण्यात आली.नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआय ने शिवराज मोटेगावकर यांना ताब्यात घेतल्यानंतर राज्यभरात खळबळ उडाली होती. तपास यंत्रणेला पेपरफुटी रॅकेटमध्ये त्यांच्या भूमिकेबाबत संशय असल्याचं सांगितलं जात आहे. यानंतर आता स्थानिक प्रशासनानेही संबंधित आर्थिक आणि मालमत्ता व्यवहारांची तपासणी सुरू केली आहे. पुणे महानगरपालिका केवळ जेएम रोडवरील आरसीसी कॅम्पसपुरती चौकशी थांबवणार नसल्याचं संकेत मिळत आहेत. मोटेगावकर यांच्याशी संबंधित शहरातील इतर मालमत्तांवरही थकीत कर, परवानग्या आणि बांधकाम नियमांचं उल्लंघन झालं आहे का, याची पडताळणी सुरू करण्यात आली आहे.

# पुणे विद्यापीठात शिष्यवृत्तीचा खोळंबा; १२,५०० हून अधिक विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित

**पुणे । प्रतिनिधी**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील २०१९-२० ते २०२५-२६ दरम्यान विविध अभ्यासक्रमांसाठी देण्यात येत असलेल्या विविध शिष्यवृत्तींचे तब्बल साडेबारा हजारांहून अधिक विद्यार्थ्यांचे पहिल्या आणि दुसऱ्या हप्त्याच्या शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित आहेत. विशेष म्हणजे केवळ २०२५-२६ या एका वर्षातील साधारण साडेसात हजारांवर अर्ज प्रलंबित असल्याचे स्पष्ट झाले आहे.**

शिष्यवृत्ती अर्जांच्या पडताळणीत होणाऱ्या दिरंगाईवर लगाम घालण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रशासनाने संलग्न महाविद्यालयांना सक्त सूचना दिल्या आहेत. महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी भरलेल्या ऑनलाईन अर्जावर रोजच्या रोज कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच, विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज महाविद्यालयाच्या स्तरावरून तत्काळ स्क्रूटिनी करून शून्य प्रलंबित करणे आवश्यक आहे.

कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालय, संस्था स्तरावर विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज प्रलंबित राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्जाच्या प्रती महाविद्यालयात जमा केल्या नाहीत, यामुळे सर्व महाविद्यालय / संस्था, विद्यापीठ यांनी त्यांच्या स्तरावर सर्व ऑनलाईन अर्ज प्रलंबित ठेवले असतील, तर असे कोणत्याही महाविद्यालय, संस्थेने करू नये.

त्यांचे सर्व प्रलंबित ऑनलाईन अर्ज स्क्रूटीनी करून मंजुरीसाठी पुढे पाठवावे, तसेच कोणत्याही महाविद्यालयास विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्जाच्या प्रती जमा न केल्यामुळे स्क्रूटीनी करण्यासाठी समस्या असेल, तर त्याबाबत सहसंचालक कार्यालय व उच्च शिक्षण संचालनालयास सविस्तर कारणासह पत्राद्वारे तत्काळ कळवावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे. शैक्षणिक संस्थांनी अर्जांच्या तपासणीसाठी कार्यशाळा आयोजित करून एकही ऑनलाईन अर्ज प्रलंबित राहणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, असे देखील विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. मुंजाजी रासवे यांनी परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

# दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात डोळ्यांच्या उपचारादरम्यान ६ वर्षांच्या चिमुरडीचा मृत्यू

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात पुन्हा एकदा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात एका सात वर्षांच्या चिमुरडीचा मृत्यू झाला आहे. धक्कादायक बाब म्हणजे डोळ्याच्या शस्त्रक्रियेदरम्यान सहा वर्षांच्या चिमुरडीचा मृत्यू झाल्याचा कुटुंबियांचा आरोप करण्यात आला आहे. प्रियदर्शनी बागडे या सहा वर्षाच्या चिमुरडीला डोळ्यात तिरळेपणा असल्यामुळे शस्त्रक्रियेसाठी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयामध्ये आणण्यात आले होते. येथे तिच्यावर तपासणी करण्यात आली. काही दिवसापूर्वी रुग्णालयाने मुलीला शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयात दाखल करण्यास सांगितलं. आता मुलीच्या डोळ्यातील तिरळेपणा दूर होईल अशा आशेने मुलीचे आई-वडील वाट पाहत होते. मात्र प्रत्यक्षात भयंकर घडलं.

ठरल्याप्रमाणे १९ मे रोजी मुलीला शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आलं. ऑपरेशन थिएटरमध्ये नेल्यानंतर तिच्या डोळ्यांमध्ये ड्रॉप सोडण्यात आले. मात्र यादरम्यान अचानक मुलीला रक्ताच्या उलट्या सुरू झाल्या. पालकांना कल्पना न देता मुलीला तातडीने आयसीयूमध्ये हलवण्यात आल्याचं सांगितलं जात आहे. अचानक तब्येत बिघडली म्हणून आम्ही तिला सीपीआर देत आहोत असं डॉक्टरांकडून सांगण्यात आलं. मात्र काहीच वेळात मुलीने जीव सोडला. घडला प्रकार बाहेर येऊ नये म्हणून रुग्णालय प्रशासनाने मुलीच्या आई-वडिलांना आर्थिक आमिष दाखवून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केल्याचा देखील आरोप करण्यात येत आहे. मात्र ससून रुग्णालयाने पोलीस तक्रारी शिवाय आम्ही शवविच्छेदनासाठी मृतदेह स्वीकारणार नाही अशी भूमिका घेतल्यानंतर प्रकरण पोलिसांमध्ये गेले. मात्र पोलिसांनी या प्रकरणात नवा पवित्रा घेतला. शवविच्छेदन अहवाल आल्याशिवाय आम्हाला गुन्हे दाखल करता येणार नाहीत असं पोलिसांकडून सांगण्यात आलं.

# माझ्या पत्नीशी का बोलतोस?' संशयातून तरुणावर चाकूने प्राणघातक हल्ला


पिंपरी

पिंपरी-चिंचवड परिसरातील किवळे येथे एक धक्कादायक घटना समोर आली आहे. 'तू माझ्या पत्नीशी फोनवर का बोलतोस?' असा संशय घेत एका व्यक्तीने शेजारी राहणाऱ्या तरुणावर चाकूने सपासप वार करून त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.ही घटना विकासनगर, किवळे येथील सनव्ह्यू अपार्टमेंटमध्ये घडली. याप्रकरणी निलेश बाबासाहेब साठे यांनी देहूरोड पोलीस ठाण्यात तक्रार देखील नोंदवली आहे. साठे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी विक्रांत काशीनाथ कुसळे याला बेड्या ठोकल्या आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमी फिर्यादी निलेश साठे आणि आरोपी विक्रांत कुसळे हे दोघेही एकाच इमारतीत वास्तव्यास आहेत. रात्रीच्या वेळी निलेश साठे हे इमारतीच्या टेरेसवर गेले होते. त्याच वेळी तिथे आरोपी विक्रांत कुसळे आला. टेरेसवर येताच विक्रांतने निलेश यांना गाठले आणि 'तू माझ्या पत्नीशी फोनवर का बोलतोस?' असा जाब विचारण्यास सुरुवात केली. यावरून दोघांमध्ये जोरदार वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला की, विक्रांतने सोबत आणलेला धारदार चाकू काढला आणि निलेश साठे यांच्या डाव्या मांडीवर आणि पोटावर सपासप वार केले. चाकूच्या हल्ल्यात निलेश साठे गंभीर रक्ताळलेल्या अवस्थेत कोसळले. त्यांना तात्काळ जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच देहूरोड पोलिसांनी आरोपी विक्रांत कुसळे याला अटक केली. याप्रकरणी पुढील तपास पोलीस करत आहेत.

# आंदेकर-कोमकर संघर्षात चौथा बळी, बालाजीनगरमध्ये गोळीबाराचा थरार

पुणे : पुण्यातील कुख्यात आंदेकर-कोमकर टोळ्यांमधील गँगवॉर पुन्हा एकदा रक्तरंजित वळणावर पोहोचला आहे. वनराज आंदेकर हत्याप्रकरणातील एका आरोपीच्या भावावर बुधवारी सकाळी पुण्यातील बालाजीनगर परिसरात गोळीबार करण्यात आला.



आंदेकर टोळीच्या शूटरांनी केलेल्या या हल्ल्यात वनराज आंदेकर खून प्रकरणात आरोपी असलेला आकाश मस्केचा भाऊ बाळा मस्केचा खून झाला आहे. या घटनेमुळे पुणे शहरात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. पुण्यातल्या बालाजी नगरच्या बस स्टॉपवर ही धक्कादायक घटना घडली आहे. आंदेकर-कोमकर गँगवॉरमधील हा चौथा खून मानला जात असून, गुन्हेगारी टोळ्यांमधील संघर्ष अधिकच तीव्र झाल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे आंदेकर टोळीचा प्रमुख बंडू आंदेकर, त्याची मुलगी आणि सून सध्या तुरुंगात असतानाही टोळीचे कारनामे सुरूच असल्याची चर्चा रंगली आहे. तुरुंगातूनच टोळीची सूत्रे हलवली जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

पोलिस तपासानुसार, आंदेकर टोळीने नेहमीप्रमाणेच हत्या घडवून आणण्यासाठी अल्पवयीन आणि तरुण मुलांचा वापर केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे पुणे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

या गँगवॉरची सुरुवात २०२५ मध्ये झाली होती. पुण्यातील गणेशपेठ भागात वनराज आंदेकर याची गोळ्या झाडून आणि कोयत्याने वार करत हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात वनराज आंदेकरच्या बहिणी आणि मेहुण्याचा सहभाग असल्याचा आरोप होता. त्यानंतर आंदेकर टोळीने बदला घेण्याची मोहीम सुरू केली. काही महिन्यांपूर्वी वनराज आंदेकरच्या बहिणीचा मुलगा आयुष कोमकर याची घरासमोर गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. त्यानंतर कात्रज-घोलेवाडी परिसरात कोमकर टोळीशी संबंधित शिंदे नावाच्या व्यक्तीचा खून करण्यात आला. बुधवारी झालेली बालाजीनगरमधील हत्या ही त्याच सूडसत्राचा भाग असल्याचे मानले जात आहे. दरम्यान, आंदेकर कुटुंबातील अनेक सदस्य तुरुंगात असतानाही त्यांचा राजकीय प्रभाव कायम असल्याची चर्चा आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढवून सोनाली आंदेकर आणि लक्ष्मी आंदेकर यांनी विजय मिळवला होता. त्यामुळे गुन्हेगारी आणि राजकारणाच्या संबंधांवरही पुन्हा प्रश्न उपस्थित केले जात आहेत. बालाजीनगर गोळीबार प्रकरणानंतर पुणे पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली असून, संबंधित शूटरचा शोध सुरू आहे.

# आरजू बिष्णोई टोळीच्या शूटर्सना हरिद्वारमध्ये बेड्या, पिंपरी चिंचवड पोलिसांची मोठी कारवाई

पुणे । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवडमध्ये गोळीबार करणाऱ्या आरजू बिष्णोई टोळीतील शूटर्सना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. पिंपरी चिंचवड पोलिसांनी हरिद्वारमध्ये जाऊन ही मोठी कारवाई केली आहे. या टोळीचा लॉरेन्स बिष्णोई टोळीशी थेट संबंध नसून त्यांचा नंबरकारीची ही टोळी आहे. याचं टोळीच्या शूटर्सचा शोध गुंडा विरोधी पथक घेत होतं. या पथकाने गेल्या पाच दिवसांपासून मध्यप्रदेश, पंजाब, हरियाणामार्गे उत्तराखंड असा पाठलाग केला आणि तिघांच्या मुसक्या आळवल्या. या शूटर्सनी पुनावळे येथील एजे फर्निचर मॉलवर शुक्रवारी रात्री पाच ते सहा गोळ्या झाडल्या होत्या. एजे फर्निचर मॉलचे अशोक नैन यांच्याकडून दोन कोटींची खंडणी वसुलण्यासाठी हा गोळीबार केल्याचं तपासात समोर आलं




आहे. अशोक नैन यांचा एमडी ड्रग्स आणि हवाला मध्ये हात आहे, म्हणून गोळीबार केल्याचं बिष्णोई टोळीने सोशल मीडियावर म्हटलं होतं. मात्र प्रत्यक्षात अशोक नैन यांचा एमडी ड्रग्स आणि हवालाशी आत्तापर्यंत कोणताही संबंध आढळेलला नाही. बिष्णोई टोळीने एजे फर्निचरप्रमाणे वीर फर्निचरकडे पाच कोटींच्या खंडणीची मागणी केली होती. लॉरेन्स बिष्णोईचा आणि या टोळीचा थेट संबंध नसल्याचं ही तपासात निष्पन्न झालं आहे.

आरजू बिष्णोई आणि कुलदीप कशीष या दोघांच्या टोळीचे हे तीन शूटर्स सदस्य आहेत. कुलदीप कशीष हा गायक सिद्धू मुसेवालावर गोळीबार करणारा शूटर आहे, जो सध्या तुरुंगात आहे.

आरजू बिष्णोई आणि कुलदीप कशीष यांच्या टोळीने पिंपरी चिंचवड मधील हा गोळीबार घडवला. प्रवीण राम निवास, पंकज राठी आणि सागर पाल अशी अटक केलेल्या तीन शूटर्सची नावं आहेत. या टोळीसाठी महाराष्ट्रातून शुभम लोणकर काम करतो. त्याचा ही शोध सुरु आहे. पिंपरी-चिंचवडमधील रावेत भागात असलेल्या 'एजे फर्निचर मॉल'वर बिष्णोई टोळीच्या तीन आरोपींनी गोळीबार केल्याची घटना घडलीहोती. या तिनही आरोपींना पिंपरी-चिंचवड पोलिसांनी उत्तराखंडमधून अटक केली आहे. या प्रकरणात दोन पिस्तुलांतून ५ ते ६ राऊंड गोळ्या झाडल्या होत्या. एजे फर्निचर मॉलचे भागीदार अशोक नैन बिष्णोई यांना ७ मे रोजी एका अज्ञाताकडून धमकीचा फोन आला होता तसे त्यांना २ कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी देखील करण्यात आली होती.